साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर
परिमल भारतवासी
तसेच निळकंठ, मोमेंटस, असली इंडियन कस्तुरी
शुभलाभ, ६ इन १ पाऊच १२० ग्रॅम रु.६५ चा ५० मध्ये
तसेच-डिओ, कापुर, शेंदर, अत्तरे, धुप अगरबत्ती होलसेल व रिटेलसाठी
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १४.०७.२०२६ | अंक नं. ०८९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रु. 2000 पासुन बेबी टॉप्स / 1000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १९९/-*




# कुख्यात सोनू बेगच्या फ्लॅटवर छापेमारी; शस्त्रसाठा व संशयास्पद वस्तू आढळल्या

श्रीरामपूर - श्रीरामपूर शहरातील कुख्यात गुंड सोनू ऊर्फ जयप्रकाश अशोक बेग हा भाड्याने राहात असलेल्या फ्लॅटवर श्रीरामपूर शहर पोलीस आणि नगरच्या जलद प्रतिसाद पथकाच्या (क्युआरटी) जवानांनी १३ जुलै रोजी रात्री ९.१५ च्या सुमारास अचानक छापा टाकून सर्च ऑपरेशन राबविले. या छाप्यात पोलिसांना एक देशी बनावटीची पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे तसेच काही संशयास्पद कागदपत्रे व फोटो आढळून आले आहेत. पोलिसांनी ते जप्त करत याप्रकरणी सोनू बेग सह त्याची पत्नी श्रद्धा रुणवाल उर्फ बेग आणि मेव्हणा शिवांजय बाळासाहेब उंडे (वय २०, रा. पढेगाव) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## दोन मुलींना डांबून ठेवल्याची मिळाली होती 'टीप'

श्रीरामपूर येथील हनुमान मंदिरामागे असलेल्या सरस्वती कॉलनीतील (वॉर्ड नं. ७) 'छाजेड अपार्टमेंट'मधील पहिल्या मजल्यावर एका फ्लॅट काही गुंडांनी बेकायदेशीर अग्निशस्त्रांचा वापर करुन दोन मुलींना डांबून ठेवले असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षकांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अंमलदार छाया गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक हंडाळळे आणि नगरच्या जलद प्रतिसाद पथकाच्या (क्युआरटी) जवानांनी १३ जुलै रोजी रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास छापा टाकला.

या फ्लॅटला बाहेरुन कडी लावलेली असल्याने पोलिसांनी फ्लॅटचे घरमालक अक्षय संजय छाजेड यांना तात्काळ बोलावून घेतले. छाजेड यांनी पोलिसांना सांगितले की, हा फ्लॅट त्यांनी शिवांजय बाळासाहेब उंडे (वय २०, रा. पढेगाव) याला भाड्याने दिला असून तो फ्लॅट शिवांजय उंडे, त्याची बहीण श्रद्धा रुणवाल आणि त्याचा साथीदार सोनू बेग हे वापरत आहेत. पोलिसांनी शिवांजय उंडे याच्याशी मोबाईलवर संपर्क साधून घराची झडती घेण्याबाबत सांगितले असता, आपण सध्या हैदराबाद येथे असल्याचे सांगून त्याने येण्यास असमर्थता दर्शवली. तसेच आरोपी सोनू बेग हा दुसऱ्या एका गुन्ह्यात सध्या जेलमध्ये असल्याचे समोर आले.

## पिस्तूलासह संशयास्पद वस्तू जप्त

त्यानंतर पोलिसांनी घरमालक आणि पंचांच्या उपस्थितीत कुलूपबंद फ्लॅटची झडती घेतली. या झडतीमध्ये पोलिसांना एक देशी बनावटीची पिस्तूल (मॅग्झीनसह) आणि दोन जिवंत काडतुसे मिळून आली. याशिवाय घरातून श्रद्धा जयप्रकाश बेग हिच्या नावाची मेडिकल फाईल, 'सोनूभाऊ' नाव लिहिलेले मोटारीचे बिल, वसंत कारभारी पवार यांच्या नावाचे ए. यु. स्मॉल फायनान्स बँकेचे कोरे चेकबुक व एटीएम कार्ड, तसेच दोन डायऱ्या आणि तीन फोटो या संशयास्पद जप्त करण्यात आले आहेत.

## गुन्हेगारी टोळीचा म्होरक्या आहे सोनू बेग

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, संशयित आरोपी सोनू ऊर्फ जयप्रकाश अशोक बेग हा श्रीरामपूर शहरामध्ये संघटित गुन्हेगारांची टोळी चालवत असून, बेकायदेशीर धंद्यातून आर्थिक लाभ मिळवतो. या आरोपींनी विक्री करण्याच्या उद्देशाने किंवा शस्त्राचा धाक दाखवून गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी आणि टोळीतील सदस्यांना पुरवण्यासाठी हे शस्त्र घरात बाळगल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार छाया गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात शिवांजय बाळासाहेब उंडे, श्रद्धा जयप्रकाश बेग आणि सोनू ऊर्फ जयप्रकाश अशोक बेग यांच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, आणि ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक विशाल खैरे करत आहेत.

## श्रीरामपूर सलग तिसऱ्या दिवशी बंद, १५ जुलैला महामोर्चा

श्रीरामपूरमध्ये ११ जुलै रोजी हॉटेल व्यावसायिक आकाश दुबय्या यांच्या दुर्दैवी हत्येच्या निषेधार्थ आणि शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या निषेधार्थ सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी व व्यापाऱ्यांनी एकत्र येत १२ जुलै पासून बंद आणि आंदोलनाचे हत्यार उपसलेले आहे. गुन्हेगारांवर मकोका लावण्याच्या मागणीसाठी १४ जुलै रोजी सलग तिसऱ्या दिवशी शहरात जनक्षोभ पाहायला मिळाला. तिसऱ्या दिवशी तर व्यापारी वर्गासोबतच सर्व शाळा, महाविद्यालये कडकडीत बंद ठेवण्यात आली होती.

आता १५ जुलै रोजी शहरातून सकल श्रीरामपूरवासियांच्या वतीने हनुमान मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा असा महामोर्चा काढण्यात येणार असल्याचे आ. हेमंत ओगले यांनी सांगितले. जोपर्यंत या गुन्हेगारी टोळ्यांना मकोका लावला जात नाही आणि या टोळ्यांचा बंदोबस्त पोलिसांकडून आणि सरकारकडून केला जात नाही, तोपर्यंत श्रीरामपूरची जनता स्वस्थ बसणार नाही, असा इशारा आ.ओगले यांनी दिला आहे.

गवांदे MATHS क्लासेस
सुवर्णपदक विजेते प्रा. गवांदे सरांचे ISO-9001:2015 मानांकित
MATHS विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून
राज्यात सर्वप्रथम
मयुरेश शिंदे 100/100 | प्रणाली कोठुळे 100/100 | श्रद्धा काळे 100/100
बोर्ड मध्ये 25 विद्यार्थ्यांना 90 पेक्षा ज्यास्त गुण
MHT-CET मध्ये 90%ile पेक्षा ज्यास्त गुण मिळविणारे 31 विद्यार्थी
JEE मध्ये 15 विद्यार्थ्यांना 90% पेक्षा ज्यास्त गुण
27 विद्यार्थी JEE(Advance) म्हणजेच IIT च्या प्रवेश परिक्षेसाठी पात्र
Maths साठी आमच्या विविध बॅचेस
11 वी MATHS | 12 वी MATHS | MHT-CET आणि JEE | क्रॅश कोर्स | FOUNDATION COURSE
न्यू आर्टस कॉलेज गेट समोर, लेंडकर मळा, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर. फोन 0241-2355513 मो.9955 35 2323

फ्लॅट भाड्याने/विक्रीस उपलब्ध
आनंदधाम परिसरात
फ्लॅट भाड्याने / विक्रीस उपलब्ध
तेजस कोठारी यांचे
नमीत प्रॉपर्टीज्
(नगर - पुणे - मुंबई - दुबई)
8421953963

रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात
छाती (फुफ्फुस) विकार व अॅलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे
MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine), Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 16 जुलै 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुफ्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार • अॅलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

१७ वे पुण्यस्मरण



स्व. अॅड. निरंजनसिंग के. पंजाबी
स्व. दि. १४/७/२००९
सबकुछ होने के बावजुद भी कुछ भी नही है।
ऐसा लगता है आपके बिना यह परिवार खाली है।
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
सौ. अनिता पंजाबी मा. नगरसेविका म.न.पा. अहिल्यानगर
जसपाल पंजाबी मा. उपनगराध्यक्ष
अॅड. गुरुविंदर पंजाबी (नात)
गुरुवक्ष पंजाबी (नातू)

# मोपेडवर जाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र दुचाकीस्वारांनी पळविले; गुन्हा दाखल

नगर - शहरातील कायनेटिक चौक ते सिना नदी पुलादरम्यान मोपेड वरून जात असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनीमंगळसूत्र दोघा चोरट्यांनी भरधाव दुचाकीवरून येत हिसकावून नेल्याची घटना १२ जुलै रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेणुका सुरेश नन्नवरे (वय ३६, रा. आदर्श गौतमनगर, कायनेटिक चौक) यांनी १३ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. त्या १२ जुलै रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोपेडवर (क्र.एम एच १६ डीव्ही ४०६६) पेट्रोल भरण्यासाठी नगर शहराच्या दिशेने येत होत्या. त्या कायनेटिक चौक ते सिना नदी पुलादरम्यान पोहोचल्या असता, मागून एका दुचाकीवर आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या मोपेडजवळ दुचाकी नेली. यावेळी मागे बसलेल्या चोरट्याने रेणुका नन्नवरे यांच्या गळ्यातील सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनीमंगळसूत्र जोरात हिसकावून घेतले.

त्यानंतर दोन्ही चोरटे सक्कर चौकाच्या दिशेने भरधाव वेगाने पसार झाले. घटनेनंतर रेणुका नन्नवरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून दोघा अज्ञात चोरट्या विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

# तरुणीच्या नावे तीन बनावट इंस्टाग्राम अकाऊंट बनवून फोटो व्हायरल करत बदनामी

नगर - एका १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीचे नाव आणि फोटोंचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीने सोशल मीडियावर ३ वेगवेगळे बनावट इंस्टाग्राम खाती (अकाऊंट्स) उघडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याद्वारे तिचे फोटो व्हायरल करत बदनामी करण्यात आली. नगर सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी राहुरी तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या पीडित तरुणीने १३ जुलै रोजी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अज्ञात आरोपीने पीडितेच्या संमतीशिवाय तिच्या वैयक्तिक फोटोंचा वापर करून इंस्टाग्रामवर तिच्या नावाने तीन बनावट आयडी तयार केले. या बनावट अकाऊंट्सवरून पीडितेचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून तिची बदनामी करण्यात आली. हा सर्व प्रकार २४ जून रोजी दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास उघडकीस आला.

आपल्या नावाचा आणि फोटोंचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पीडित तरुणीने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. तिच्या फिर्यादीवरून सायबर पोलिसांनी १३ जुलै रोजी अज्ञात आरोपीच्या विरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम (आयटी अॅक्ट) २००० चे कलम ६६(सी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ढिकले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Become a COMPUTER PROFESSIONAL
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
दिल्ली गेट शाखा 9371051769 | जुने बस स्टँड शाखा 9371151769 | पाईपलाईन शाखा 7447761769

भावपूर्ण श्रध्दांजली
सावडायचा विधी
बुधवार, दि. १५-०७-२०२६ सकाळी ९ वाजता लालटाकी स्मशानभूमी, अहिल्यानगर



कै.अर्जुन पांडुरंग बेद्रे
स्व.सोमवार दि.१३/०७/२०२६
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
: दुःखांकित :
दत्तात्रय पांडुरंग बेद्रे । हिरामण पांडुरंग बेद्रे
विमाप्पा पांडुरंग बेद्रे । भगवान दत्तात्रय बेद्रे
संतोष हिरामण बेद्रे । गणेश गंगाधर बेद्रे ।
विशाल अर्जुन बेद्रे । विजय अर्जुन बेद्रे ।
आनंद दशरथ चौधरी । आरोश विशाल बेद्रे
समस्त बेद्रे परिवार

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे, क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स, कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका!
ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ‘विजेचे खांब व लोंबकळलेल्या तारा, उघड्या डीपीं’बाबत वारंवार तक्रारी करुनही महावितरणकडून दखल नाही

**नागरिकांमध्ये संताप; नगरसेवक सागर बोरुडे यांचे प्रशासनाला निवेदन**

नगर – खराब अवस्थेतील विजेचे खांब, लोंबकळलेल्या आणि जिर्ण झालेल्या विद्युत तारा तसेच रस्त्याच्या उंचीमुळे धोकादायकरीत्या खाली आलेल्या वीजवाहिन्यांचा प्रश्न शहरासह उपनगरांमध्ये दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. याबाबत वारंवार तक्रारी करुनही महावितरणकडून दखल घेतली जात नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.

स्टेशन रोडवरील आनंदनगर येथील विजेच्या खांबाबत तक्रार करुनही वर्षभर कोणतीही दखल घेण्यात आलेली नव्हती. अखेरीस या खाबांने एका चिमुकलीचा जीव घेतला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आपल्या घराजवळून गेलेल्या विद्युत तारा, खराब खांब यांबाबत नागरिक तक्रार करीत आहेत. मात्र, महावितरणकडून या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे दिसून येत आहे.

सावेडी परिसरातील डॉन बॉस्को भागामध्ये खराब अवस्थेतील विजेचे खांब, झुकलेल्या विद्युत तारा यांबाबत नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी महावितरणकडे तक्रार केली होती. मात्र, चार महिन्यांहून अधिक काळ उलटूनही महावितरणने कोणतेही दखल घेतली नाही.


महावितरणला निवेदन देताना नगरसेवक डॉ. सागर बोरुडे व इतर नागरिक. (छायाचित्र – लहू दळवी)

त्यामुळे डॉ. बोरुडे यांनी महावितरणच्या कार्यपद्धतीबाबत संताप व्यक्त केला. तसेच त्यांनी पुन्हा कार्यकारी अभियंता चव्हाण यांना निवेदन देऊन दुरुस्तीची मागणी केली. यावेळी धीरज लोणारे, आदित्य काकडे, रोहिणी अंकुश, सुनंदा हिरवाळे, हेमलता कांबळे, शोभा भिंगारदिवे, सुरेखा फुलपगार, रेश्मा भिंगारदिवे, सुनिता दिवे, सुरेखा बारसे, संगीता अकोलकर, ताराबाई भिंगारदिवे, विमल खरात, पल्लवी खरात आदी नागरिक उपस्थित होते.

डॉ. सागर बोरुडे यांनी सांगितले, डॉन बॉस्को परिसरातील विजेच्या धोकादायक परिस्थितीबाबत २० मार्च २०२६ रोजी सावेडी विभागाचे सहाय्यक अभियंता यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही महावितरण प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. नागरिकांनी वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही त्यांची दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

डॉ. बोरुडे म्हणाले, अनेक ठिकाणी विद्युत तारा एकमेकांच्या संपर्कात येत असून वादळी वाऱ्याच्या वेळी त्या एकमेकांवर आदळून शॉर्टसर्किट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आग लागणे, विजेचा शॉक लागणे किंवा इतर गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारची एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दूरध्वनीद्वारे सूचना देत डॉन बॉस्को परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश दिले. त्यामुळे या गंभीर प्रश्नावर लवकरच कार्यवाही होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

## नगरमध्ये मुक्कामी दिंडीतील वारकरी वृध्द महिलेचा मृत्यू

नगर – पंढरपूरकडे निघालेल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी पालखी दिंडीत सहभागी असलेल्या एका ७८ वर्षीय वारकरी महिलेचा अहिल्यानगर शहरात झोपेतच मृत्यू झाल्याची घटना १३ जुलै रोजी पहाटे घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


सुमनबाई कांडेकर

मृत महिलेचे नाव सुमनबाई मधुकर कांडेकर (वय ७८, रा. जातेगाव, ता. जि. नाशिक) असे आहे. त्या पंढरपूरकडे जाणाऱ्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी पालखी दिंडीत सहभागी होत्या. १२ जुलै रोजी रात्री त्या मार्केट यार्ड परिसरातील हमाल पंचायत कार्यालयासमोर इतर वारकऱ्यांसह झोपल्या होत्या. १३ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास सहकाऱ्यांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या कोणताही प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात आल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी येथील शासकीय जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले.

तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. काळे यांनी तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची माहिती रूग्णालय प्रशासनाकडून पोलिसांना देण्यात आल्यानंतर कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असून, कोतवाली पोलीस पुढील तपास करीत आहेत. मयत सुमनबाई या गेल्या काही वर्षांपासून दरवर्षी पायी वारी करत होत्या. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## कांदा मार्केट येथे ट्रकचालकाचा हृदय विकाराने मृत्यू

नगर – नेप्ती कांदा मार्केट परिसरामध्ये कांदा भरण्यासाठी आलेल्या केरळ राज्यातील एका ट्रक चालकाचा हृद्यविकाराने मृत्यू झाल्याची घटना १३ जुलैला दुपारी घडली. रेणू जॉकब (वय ५३, रा. वल्लमकुलम, जिल्हा पठाणमथिट्टा, राज्य – केरळ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मृत रेणू जॉकब यांना पूर्वीपासूनच हृदयाचा त्रास होता. १३ जुलै रोजी ते येथील नेप्ती कांदा मार्केटमध्ये ट्रक भरण्यासाठी आले होते. काम करत असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र वेदना होऊ लागल्याने ते निपचित पडले. ही बाब समजताच त्यांचे गाडी मालक प्रमिल अब्राम (रा. खुलुमनाली, जिल्हा – पठाणमथिट्टा, राज्य – केरळ) यांनी त्यांना तातडीने बेशुद्ध अवस्थेत नगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच दुपारी १२ वाजेच्या सुमारास डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांच्या माहितीवरून कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## धनादेश बाऊन्सप्रकरणी शिक्षा कायम

नगर – उसनवारीने घेतलेल्या ११ लाखांच्या परतफेडीसाठी दिलेले ३ धनादेश वटले नसल्याप्रकरणी गंजबाजार येथील हॉटेल पारिकचे संचालक दिनेश गौरीशंकर पारिक यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली कैदेची व नुकसानभरपाईची शिक्षा प्रधान जिल्हा व सत्र न्यायालयाने अपिलात कायम ठेवली आहे. सराफ बाजारातील कांकरीया ज्वेलर्सचे संचालक अभय शांतीलाल कांकरीया यांनी पारिक यांच्याविरोधात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत तीन स्वतंत्र फौजदारी खटले दाखल केले. या खटल्यात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी आरोपीस ९ टक्के व्याजासह नुकसानभरपाई आणि एक महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधातील तीनही अपिले प्रधान जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावत कनिष्ठ न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. फिर्यादीतर्फे ॲड. रमेश जोशी यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. दिपाली झांबरे व ॲड. राजेश करमरकर यांनी सहकार्य केले.

# बीएलओ घरोघर जाण्याऐवजी एकाच ठिकाणी बसून वाटतात अर्ज

**विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण अभियानातील त्रुटी दूर करा**

नगर – शहरात सध्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण अभियान सुरू आहे. या अभियानाच्या प्रत्यक्ष कामकाजात अनेक गंभीर त्रुटी व अडचणी निदर्शनास येत असून त्यामुळे पात्र मतदारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. बीएलओ यांना घराघरात जाऊन पडताळणी करण्याचे आदेश आहेत. मात्र, अनेक बीएलओ प्रत्यक्षात घरोघर न जाता एकाच ठिकाणी बसजून अर्ज वाटप करीत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे या अभियानाचा उद्देश सफल होताना दिसत नाही.


उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांना निवेदन देताना संभाजी कदम, दत्ता कावरे, बाळासाहेब बोराटे, संजय शेंडगे, शाम नळकांडे, काका शेळके आदी.

त्यामुळे या अभियानातील त्रुटी दूर करुन अभियानास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली आहे.

शहर प्रमुख संभाजी कदम, गटनेते दत्ता कावरे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, नगरसेवक संजय शेंडगे, शाम नळकांडे, संदीप दातरंगे, काका शेळके, परेश लोखंडे, विकी लोखंडे, रणजित परदेशी, अण्णा घोलप, दीपक थोरात, आबासाहेब गुंड, योगेश गलांडे, प्रताप गडाख, विनोद शिरसाठ यांनी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांना निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे, अनेक भागांत नियुक्त करण्यात आलेले बीएलओ घराघरात जाऊन पडताळणी करण्याऐवजी एका ठिकाणी बसून केवळ अर्जांचे वाटप करत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहेत. शासनाने निश्चित केलेल्या पद्धतीनुसार प्रत्येक मतदारापर्यंत प्रत्यक्ष पोहोचून माहितीची पडताळणी करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी ही प्रक्रिया होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक पात्र मतदारांपर्यंत आवश्यक माहिती पोहोचत नाही. तसेच मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यापूर्वी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करण्यात यावा, संबंधित व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबीयांना योग्य ती नोटीस व संधी देण्यात यावी आणि त्यानंतरच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही प्रकारची खातरजमा न करता किंवा पंचनामा न करता नावे वगळण्यात आल्यास अनेक पात्र नागरिक मतदानाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यवाहीस त्वरित आळा घालण्यात यावा. याशिवाय काही बीएलओ आपल्या जबाबदारीबाबत पुरेसे गांभीर्य दाखवत नसल्याच्या तक्रारीही प्राप्त होत आहेत. नागरिकांच्या शंकांचे समाधान न करणे, वेळेवर उपलब्ध न राहणे, अपुरी माहिती देणे तसेच नियमानुसार काम न करणे अशा प्रकारच्या बाबी वारंवार समोर येत आहेत. अशा कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन त्यांच्या कामावर प्रभावी देखरेख ठेवण्यात यावी. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यामुळे अनेक भागांत नागरिकांना घरी भेट देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे तसेच बीएलओंनाही प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणे अत्यंत कठीण होत आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव केवळ तांत्रिक कारणांमुळे किंवा अपुऱ्या पडताळणीमुळे वगळले जाणार नाही, यासाठी या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण अभियानास पुरेशी मुदतवाढ देण्यात यावी. तसेच सर्व बीएलओंना घराघरात जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे सक्त निर्देश देण्यात यावेत, मतदारांचे नाव वगळण्यापूर्वी पंचनामा व आवश्यक प्रक्रिया बंधनकारक करण्यात यावी, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी आणि नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, न्याय्य व विश्वासार्ह पद्धतीने राबविण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली आहे.

## केडगाव येथे वृद्धाची गळफास घेत आत्महत्या

नगर – केडगाव परिसरातील वैष्णवनगर येथे राहणाऱ्या एका ७७ वर्षीय वृद्धाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १३ जुलै रोजी घडली. रामदास नामदेव खिळे (वय ७७, रा. वैष्णवनगर, केडगाव, अहिल्यानगर) असे मृत वृद्धाचे नाव आहे.

रामदास खिळे यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेतल्याची ही बाब लक्षात येताच त्यांचे नातेवाईक ज्ञानदेव संतोष रणदिवे (रा. मराठानगर, केडगाव) यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दुपारी १२ वाजेच्या सुमारास दाखल केले. मात्र, उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांनी त्यांना तपासून औषधोपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची माहिती कोतवाली पोलीस स्टेशनला कळविण्यात आली. या माहितीच्या आधारे कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# मतांसाठी आम्ही...आणि रोजगारासाठी कोण? स्थानिक कचरा वेचकांनी मांडल्या व्यथा

**रामवाडीत रंगली कष्टकऱ्यांची चहावर चर्चा; रोजगाराला प्राधान्य, सुरक्षा, कामाची शाश्वती आणि सुविधा पुरविण्याची कचरा वेचकांची मागणी**

नगर – रामवाडी येथे आयोजित कष्टकऱ्यांची चहावर चर्चा या बैठकीत महिला व पुरुष कचरा वेचकांची विविध विषयावर चर्चा रंगली होती. यामध्ये शहरातील कचरा वेचक वर्ग सहभागी झाले होते. ही चर्चा बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर (पायलट प्रकल्प) आयोजित करण्यात आली होती. यावेळी २० कचरा वेचकांना सुरक्षा साहित्य (सेफ्टी किट) वितरित करण्यात आले.


हसरू दला संस्थेच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर (पायलट प्रकल्प) रामवाडी येथे आयोजित कष्टकऱ्यांची चहावर चर्चा या बैठकीत २० कचरा वेचकांना सुरक्षा साहित्य (सेफ्टी किट) वितरित करण्यात आले.

या उपक्रमातून कचरा वेचकांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या हक्क, सन्मान आणि रोजगाराच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत सुभद्राबाई उल्हारे, अलका उल्हारे आणि इतर कचरा वेचकांनी अनेक वर्षांपासून शहराची स्वच्छता राखण्यासाठी योगदान देऊनही रोजगाराची शाश्वती, सामाजिक सुरक्षा, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य आणि सन्मान यांसारख्या मूलभूत सुविधांची आवश्यकता अधोरेखित केली.

स्थानिक कचरा वेचकांना रोजगाराच्या संधींमध्ये प्राधान्य मिळावे, जेणेकरून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरक्षित होईल, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. मतांसाठी आम्ही... आणि रोजगारासाठी कोण? हा प्रश्न उपस्थित करत स्थानिक श्रमिकांना न्याय मिळावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

चर्चेदरम्यान बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेने कचरा वेचकांच्या संघटन, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी राबविलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. पायलट प्रकल्पांतर्गत वितरित करण्यात आलेल्या २० सेफ्टी किटचा अनुभव सकारात्मक असून, भविष्यात अशा सुविधा अधिकाधिक कचरा वेचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी स्थानिक कचरा वेचकांना रोजगारात प्राधान्य, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य, आरोग्य विमा, सामाजिक सुरक्षा योजना आणि नियमित उपजीविकेची हमी यासाठी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीच्या शेवटी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या नेतृत्वाखाली कचरा वेचकांना अधिक संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने पुढील भूमिका निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी माहिती दिली.

आम्ही केवळ मतदार नाही; आम्ही शहर स्वच्छ ठेवणारे श्रमिक आहोत. आमच्या श्रमाचा सन्मान, आमच्या हक्कांचे संरक्षण आणि स्थानिक कचरा वेचकांना रोजगारात योग्य प्राधान्य मिळावे, अशी भावना उपस्थित कचरा वेचकांनी व्यक्त केली.

## विश्वनाथ चिट्याल यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नित्यसेवा हौसिंग सोसायटी येथील विश्वनाथ व्यंकय्या चिट्याल (वय ७४) यांचे १४ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते दैनिक ‘नवा मराठा’चे माजी कर्मचारी व प्रकाश चिट्याल यांचे वडिल होत.

## राजकंवरबाई गुगळे यांचे संथाराव्रतात निधन

नगर – शांतीनिकेतन नगर, लिंकरोड, कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, केडगाव येथील रहिवासी राजकंवरबाई वसंतलाल गुगळे (वय ८१) यांचे १४ जुलै रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, २ मुली, जावई असा परिवार आहे. संजय व सुनील गुगळे यांच्या त्या मातोश्री तर ऋषभ, प्रणव, सिद्धार्थ गुगळे यांच्या आजी होत.

## अर्जुन बेद्रे यांचे दुःखद निधन



नगर – येथील बेलदार गल्लीतील अर्जुन पांडुरंग बेद्रे (वय ६७) यांचे १३ जुलै रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्यावर गवळी समाज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. गवळी समाज ट्रस्टचे सचिव हिरामण बेद्रे अण्णा यांचे ते लहान बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## विकास गोयर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नालेगाव येथील गोगादेव मंदिरा शेजारील विकास सुभाष गोयर (वय ४६) यांचे १३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## नगर-पुणे महामार्गावर भीषण अपघातात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

नगर – नगर – पुणे महामार्गावरील चास (ता.नगर) शिवारात दोन दुचाकी आणि एका चारचाकी वाहनाचा विचित्र अपघात होऊन यामध्ये एका २८ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. केतन कानीफनाथ गवारे (रा. मु.पो. ब्रम्हगाव, ता. आष्टी, जि. बीड) असे अपघातात मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे.

केतन गवारे हे १२ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास आपल्या ताब्यातील हिरो स्प्लेंडर मोटरसायकलवरून (क्र. एमएच १४ एमजे ५६४९) जात होते. याच वेळी पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या होंडा युनिकॉर्न मोटरसायकल (क्र. एमएच २० एच सी ६७५९) चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून केतन यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे केतन हे दुचाकीवरून रस्त्यावर खाली कोसळले आणि त्यांच्या डोक्याला व शरीरावर गंभीर दुखापत झाली.

याच दरम्यान, धडकेमुळे केतन यांची स्प्लेंडर दुचाकी नगरकडून पुणे बाजूकडे जाणाऱ्या रोडवर उडून पडली. त्याच वेळी नगरकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका चारचाकी कारने (क्र. एमएच ३१ ईयु ३५२९) या पडलेल्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या विचित्र अपघातामध्ये कार व स्प्लेंडर मोटरसायकलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तात्काळ रुग्णवाहिका बोलावून गंभीर जखमी केतन गवारे यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय येथे दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

याप्रकरणी नितीन बाळासाहेब गवारे (वय ३२, रा. ब्रम्हगाव, ता. आष्टी, जि. बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी युनिकॉर्न चालक पवन जालिंदर सोनवणे (रा. मु.पो. भादली, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# १ ऑगस्टपासून हस्तलिखित स्वाक्षरीला पूर्णविराम; शासकीय कागदपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी अनिवार्य

मुंबई – महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय कामकाजात मोठी क्रांती घडवून आणणारा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाचे सर्व महत्त्वाचे आदेश, शासन निर्णय, अधिसूचना आणि इतर संवेदनशील कागदपत्रे आता पूर्णपणे डिजिटल करण्यात येणार आहेत. १ ऑगस्ट २०२६ पासून या दस्तऐवजांवर हस्तलिखित स्वाक्षरीऐवजी केवळ डिजिटल स्वाक्षरी किंवा ई–साईन अनिवार्य करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे अव्वर सचिव योगेश गोसावी यांनी यासंदर्भात १३ जुलै २०२६ रोजी अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. प्रशासकीय कामकाज अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि गतिमान करणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. या डिजिटल स्वाक्षरीमुळे दस्तऐवजांची सत्यता, अखंडता आणि दीर्घकालीन पडताळणीयोग्यता सुनिश्चित होणार आहे.

शासनाच्या या नवीन धोरणानुसार शासन निर्णय, शासन परिपत्रके, कार्यालयीन आदेश आणि अधिसूचना, जमीन संपादन विषयक आदेश, मंजुरीपत्रे आणि संबंधित इतर कागदपत्रे, न्यायालयीन, अर्ध–न्यायालयीन आणि वैधानिक प्रकरणांशी संबंधित आदेश व निर्देश, उच्च व सर्वोच्च न्यायालय तसेच राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशांच्या अंमलबजावणीशी संबंधित शासन आदेश, प्रशासकीय व वित्तीय मंजुरी आणि निधी वितरणाचे आदेश, नियुक्ती, पदोन्नती, बदली आणि सेवाविषयक आदेश, निविदा, करारनामे, सामंजस्य करार आणि इतर संविदात्मक दस्तऐवज तसेच महसूल, वन, आदिवासी, नगरविकास, पायाभूत सुविधा, खनिज व पर्यावरण विषयाशी संबंधित आदेश आणि नागरिकांचे हक्क, मालमत्ता, लाभ आणि परवान्यांशी संबंधित प्रमाणपत्रे व आदेश यांना ई–साईन अनिवार्य करण्यात आली आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या संकेतस्थळांवर आणि कार्यप्रवाहात आवश्यक ती तांत्रिक व्यवस्था ३१ जुलैपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केवळ अपवादात्मक आणि अपरिहार्य परिस्थिती वगळता यापुढे हस्तलिखित स्वाक्षरी स्वीकारली जाणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

## बुरूडगाव रोडवर शेतकऱ्याला खोऱ्याच्या दांड्याने मारहाण

नगर – बुरूडगाव रस्ता परिसरातील समर्थनगर येथे घरासमोर साचलेली माती हटविण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका शेतकर्या वर खोर्यायने हल्ला करून मारहाण करण्यात आल्याची घटना १२ जुलै रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी चार जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बाबासाहेब किशोर राऊत (वय ४०, रा. समर्थनगर, बुरूडगाव रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार सागर सुनील राऊत, राजेश संजय राऊत, अमोल संजय राऊत, सुनील गुलाब राऊत (रा. बुरूडगाव रस्ता) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या घरासमोर ठेवलेली माती जेसीबीच्या साहाय्याने ढकलून समोरील नारळाच्या झाडावर पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ते झाडावर पडलेली माती बाजूला करण्यासाठी गेले असता, तेथे वाद निर्माण झाला. यावेळी सागर राऊत याने त्यांच्या हातातील खोरे हिसकावून घेत मारहाण केली. तसेच इतर तिघांनीही मारहाण केली. हातपाय तोडण्याची, कार्यक्रम करतो अशी धमकी देत शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### 'फुप्फुसांचा प्राणायाम'

खोल श्वास घेणे ही दिसायला सोपी पण आतून शरीर-मनाला संजीवनी देणारी क्रिया आहे. प्राचीन काळापासून याला 'योगाचा आत्मा' मानले जाते आणि आता आधुनिक वैद्यकशास्त्रानेही याला 'नैसर्गिक स्ट्रेसबस्टर'चा दर्जा दिला आहे. खोल श्वास ऑक्सिजन, प्राणशक्ती, रक्ताभिसरण आणि शांत करणाऱ्या हार्मोन्सने समृद्ध असतो. यातील खास 'डायफ्रामॅटिक ब्रीदिंग' नावाची पद्धत फुप्फुसांची क्षमता वाढवते, शरीरातील कार्बन डायऑक्साइड कमी करते आणि पेशी-पेशींना ताजेतवाने करते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी खोल श्वास रामबाण आहे कारण एका मिनिटाच्या खोल श्वासातून मेंदूला जवळपास २०% जास्त ऑक्सिजन मिळतो. ताण-तणाव कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी ही सवय उत्तम आहे, कारण यात मन शांत होते आणि कॉर्टिसोल हार्मोनचे प्रमाण कमी होते. नियमित सरावाने हृदयाची गती स्थिर होते तर पॅरासिम्पॅथेटिक नर्व्ह सिस्टीम सक्रिय होऊन उच्च रक्तदाब व चिंतेसारख्या आजारांपासून बचाव करते. रागाच्या भरात मन शांत ठेवण्यासाठी, एकाग्रता वाढवण्यासाठी आणि झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठीही खोल श्वासाचा उपयोग होतो. आयुर्वेदात खोल श्वासाला वात-पित्त-कफ संतुलित करणारी व प्राणवायू वाढवणारी क्रिया मानले आहे. सोप्या पद्धतीमुळे ते ऑफिस, घर, प्रवास अशा अनेक ठिकाणी केले जाते. खोल श्वास आपल्या श्वासातला असल्याने अधिक गुणकारी ठरतो.

## पाककला

### पनीर कोल्हापुरी

**साहित्य :** पनीर चौकोनी तुकडे २५० ग्रॅम, बारीक चिरलेला कांदा २ मोठे, बारीक चिरलेला टोमॅटो २ मध्यम, आले-लसूण पेस्ट १ चमचा, सुके खोबरे किस २ चमचे, तीळ १ चमचा, खसखस १ चमचा, कांदा-लसूण मसाला ३ चमचे, लाल तिखट १ चमचा, हळद १/४ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, काजू पेस्ट २ चमचे, कसुरी मेथी १ चमचा, तेल ३ चमचे, बटर १ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, फ्रेश क्रीम २ चमचे सजावटीसाठी

**कृती :** कढईत १ चमचा तेलावर सुके खोबरे, तीळ, खसखस गुलाबी होईपर्यंत भाजून घ्या. थंड झाल्यावर बारीक वाटून घ्या. त्याच कढईत उरलेले तेल + बटर गरम करून बारीक चिरलेला कांदा सोनेरी होईपर्यंत परता. आले-लसूण पेस्ट घालून कच्चा वास जाईपर्यंत परता. आता बारीक चिरलेला टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात वाटलेला मसाला घालून ३ मिनिटे परता. कांदा-लसूण मसाला, लाल तिखट, हळद, गरम मसाला घालून तेल सुटेपर्यंत परता. काजू पेस्ट आणि अर्धा कप गरम पाणी घालून ग्रेव्ही ५ मिनिटे उकळा. चवीनुसार मीठ घाला. आता पनीरचे तुकडे घालून २ मिनिटे शिजवा. शेवटी कसुरी मेथी हातावर चुरडून घाला आणि गॅस बंद करा. वरून फ्रेश क्रीम आणि कोथिंबीर पेरा. गरमागरम पनीर कोल्हापुरी नान, पोळी किंवा जिरा राईस सोबत सर्व्ह करा. तिखट कमी हवे असल्यास कांदा-लसूण मसाला १.५ चमचा वापरा.

## वास्तू

### बांधकाम करताना

* पायात, भिंतीत तुटक्या, जळक्या विटा, जुने लाकूड वापरू नका. नवीन घरात जुने सामान म्हणजे जुन्या मालकाचे दोष येणे.

* मुख्य दरवाजाला लाकडी किंवा मार्बलचा उंबरठा बसवा. तो जमिनीपेक्षा थोडा उंच असावा. नकारात्मक ऊर्जा, किडे आत येत नाहीत.

* मुख्य दरवाजा सर्वात मोठा आणि सर्वात उंच असावा.

## सौंदर्य

पुरुषांनी दाढी करण्यापूर्वी २ मिनिटे गरम पाण्यात भिजवलेला टॉवेल चेहऱ्यावर ठेवा. केस मऊ होतात, कट होत नाहीत आणि दाढी स्मूथ होते.

## सल्ला

कोरडे मसाले थेट तेलात टाकण्याऐवजी १-२ चमचे पाण्यात किंवा फेटलेल्या दह्यात मिक्स करून पेस्ट बनवा आणि मग फोडणीत टाका. मसाले जळत नाहीत आणि कमी तेलातही छान चव येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. १५ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पुष्य २१।४७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक लाभ होईल, रखडलेली कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी मान-सन्मान मिळेल, नवीन संधी मिळतील.

**मिथुन :** जुने वाद मिटतील, प्रवासाचे योग आहेत.

**कर्क :** कामाचा ताण वाढेल, पण धनलाभाची शक्यता आहे.

**सिंह :** नशिबाची साथ लाभेल, मोठे निर्णय यशस्वी ठरतील.

**कन्या :** विरोधकांवर मात कराल, नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील.

**तूळ :** रखडलेले पैसे परत मिळतील, घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृश्चिक :** व्यवसायात प्रगती होईल, नवीन जबाबदारी मिळेल.


**धनु :** अडकलेली कामे गतीने पूर्ण होतील, शुभवार्ता मिळेल.

**मकर :** आरोग्याची काळजी घ्या, कामात धावपळ जास्त होईल.

**कुंभ :** उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील, दिवस उत्साही राहील.

**मीन :** नोकरीत बढतीचे योग आहेत, जुनी चिंता दूर होईल.

## शब्दगंध क्र. ७४७३ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) उच्च प्रतीचा एक तांदूळ ४) एक फूल ६) नदीचे उंच तीर; डोंगराची तुटलेली बाजू ७) भाळ; ललाट ८) सोवळ्याचे रेशमी वस्त्र ११) एक पक्षी; बगळा १३) सुंदर स्त्रीचे विशेषण १५) कवच; साल; आवरण १७) पोस्ट; मेल; टपाल १८) सरळ नसलेला; वक्र १९) सरळसोट लांब लाकूड किंवा बांब २१) काश्मीरमधील एक प्रमुख नदी २३) ऐसपैस घातलेली मांडी २४) 'नारायण नारायण' असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारा देवर्षी

**उभे शब्द :-** १) एक भाजी २) झाडाखालचा ओटा; पलीकडे ३) निबर; उग्र; तापट; कठीण ४) महाभारतकालीन एक जंगल ५) क्षण; घटिकेचा साठावा अंश ९) मध्यस्थ; अडत्या १०) चिन्ह; खूण १२) कोरा; न लिहिलेला (कागद वगैरे) १४) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १६) एक प्रकारचा झाडू; नागाचा फणा १९) एक धान्य २०) समोरासमोरची लढाई २१) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे २२) नाद; हट्ट; कवितेचे एक वृत्त

### शब्दगंध क्र. ७४७२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | म | का | ■ | अ | चा | न | क |
| ज | न | ग | ण | ना | ■ | ■ | व |
| रा | न | ■ | ■ | था | ली | पी | ठ |
| म | ■ | अं | ■ | श्र | ■ | ■ | ■ |
| र | ज | त | ■ | म | क | ब | रा |
| ■ | मा | र | क | ■ | स | र | स |
| पा | ■ | पा | र | ख | ■ | क | ■ |
| प | ल | ट | ण | ■ | स | त | रा |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** गमावलेल्या गोष्टींचा विचार करण्यापेक्षा, ज्या गोष्टी अजून सोबतीला आहेत त्यांचा वापर करून पुढे जाणे म्हणजेच शहाणपण होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मासे तर कायमच पाण्यात राहतात मग ते पाणी पितात का?

मासे पाण्यातच राहतात, मग ते पाणी पितात का, हा प्रश्न वरवर अत्यंत साधा वाटत असला, तरी यामागचे वैज्ञानिक सत्य खूप रंजक आहे. याचे एका शब्दात उत्तर द्यायचे तर हो आणि नाही दोन्ही! निसर्गाने माशांची शारीरिक रचना ते नेमके कोणत्या पाण्यात राहतात-म्हणजे गोड्या पाण्यात की समुद्राच्या खाऱ्या पाण्यात-यानुसार वेगळी बनवली आहे. या संपूर्ण प्रक्रियेच्या मागे विज्ञानाचा एक महत्त्वाचा नियम काम करतो, ज्याला 'ऑस्मोसिस' म्हणजेच अभिसरण म्हणतात. या नियमानुसार, पाणी नेहमी कमी क्षाराकडून (कमी मीठ असलेल्या भागाकडून) जास्त क्षार असलेल्या भागाकडे त्वचेद्वारे किंवा कल्लयांद्वारे आपोआप प्रवास करते. याच एका नियमामुळे नदीत राहणाऱ्या माशांची जीवनपद्धती आणि समुद्रात राहणाऱ्या माशांची जीवनपद्धती एकमेकांपासून अगदी उलटी असते.

नदी, तलाव, विहीर किंवा धरणाच्या गोड्या पाण्यात राहणाऱ्या माशांचा विचार केला, तर हे मासे कधीही तोंडातून पाणी पीत नाहीत. याचे कारण असे की, गोड्या पाण्यात मिठाचे किंवा क्षारांचे प्रमाण खूप कमी असते, तर त्या तुलनेत माशांच्या शरीरात क्षारांचे प्रमाण जास्त असते. ऑस्मोसिसच्या नियमामुळे बाहेरील गोडे पाणी माशांच्या त्वचेतून आणि त्यांच्या कल्लयांमधून आपोआप शोषले जाऊन सतत त्यांच्या शरीरात प्रवेश करत असते. जर अशा माशांनी तोंडातून अजून पाणी प्यायले, तर त्यांच्या शरीरात पाण्याचे प्रमाण प्रमाणाबाहेर वाढेल आणि त्यांच्या पेशी फुगून फाटू शकतील. म्हणूनच हे मासे कधीच पाणी पीत नाहीत, उलट शरीरात आपोआप जमा झालेले जास्तीचे पाणी ते सतत लघवीद्वारे अत्यंत पातळ स्वरूपात शरीराबाहेर टाकत असतात.

याच्या अगदी उलट परिस्थिती समुद्राच्या खाऱ्या पाण्यात राहणाऱ्या माशांची असते. समुद्राच्या पाण्यात मिठाचे प्रमाण खूप जास्त असते आणि त्या मानाने माशांच्या शरीरात क्षारांचे प्रमाण कमी असते. यामुळे निसर्गाच्या नियमानुसार समुद्राचे खारे पाणी माशांच्या शरीरातील पाण्याचे अंश कल्लयांद्वारे सतत बाहेर खेचून घेत असते. यामुळे समुद्रातील माशांच्या शरीरात सतत पाण्याची कमतरता म्हणजेच डिहायड्रेशन होण्याचा धोका असतो. पाण्यात राहूनही शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये आणि जिवंत राहता यावे, म्हणून हे खाऱ्या पाण्यातील मासे सतत तोंडातून भरपूर पाणी पितात. आता प्रश्न असा पडतो की, एवढे खारे पाणी प्यायल्यावर त्यांच्या शरीरात मीठ जास्त का होत नाही? तर निसर्गाने त्यांच्या कल्लयांमध्ये 'क्लोराईड सेल्स' नावाची एक विशेष यंत्रणा दिली आहे. ही यंत्रणा खारे पाणी प्यायल्यानंतर त्यातील जास्तीचे मीठ आणि इतर क्षार वेगळे करून शरीराबाहेर टाकते आणि फक्त शुद्ध पाणी माशाच्या शरीराला पुरवते. तसेच हे मासे आपल्या शरीरातील पाणी टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत कमी आणि घट्ट स्वरूपात लघवी करतात.

यावरून हेच स्पष्ट होते की, पाण्यात राहूनही प्रत्येक माशाची पाण्याची गरज वेगळी असते. गोड्या पाण्यातील माशांना शरीरातून पाणी बाहेर काढण्यासाठी धडपड करावी लागते, तर खाऱ्या पाण्यातील माशांना शरीरात पाणी टिकवून ठेवण्यासाठी सतत पाणी प्यावे लागते. थोडक्यात सांगायचे तर, नदीतला मासा कधीच पाणी पीत नाही आणि समुद्रातला मासा पाण्याशिवाय एक क्षणही जगू शकत नाही.

### ईच्छाशक्ती

खळद नावाच्या एका छोट्या गावात समीर नावाचा एक तरुण राहत होता. त्याला आरोग्याची आणि व्यायाम करण्याची खूप आवड होती. शहरात जाऊन मोठ्या जिममध्ये व्यायाम करावा, तिथल्या चकचकीत मशिन वापराव्यात आणि पिळदार शरीर बनवावे, असे त्याचे स्वप्न होते. पण घरची परिस्थिती बेताची असल्याने त्याला शहरात जाणे किंवा महागड्या जिमची फी भरणे शक्य नव्हते. यामुळे तो अनेकदा नाराज असायचा.

एक दिवस गावात विनायकराव नावाचे एक गृहस्थ राहण्यास आले. ते भारतीय सैन्यातून निवृत्त झाले होते. वाढते वय असूनही त्यांची तब्येत एखाद्या विशीतल्या तरुणासारखी सुदृढ आणि लवचिक होती. समीरने त्यांना पाहिले आणि तो थक्क झाला. तो विनायकरावांकडे गेला आणि म्हणाला, काका, तुमची तब्येत एवढी छान आहे! तुम्ही शहरातल्या कोणत्या मोठ्या जिममध्ये जाता? तिथे कोणत्या मशिनवर व्यायाम करता?

विनायकराव हसले आणि म्हणाले, समीर, शरीर कमावण्यासाठी महागड्या मशिनची किंवा डंबेल्सची गरज नसते. निसर्गाने आपल्याला जे शरीर दिले आहे, तेच स्वतःमध्ये एक फिरती जिम आहे. मी फक्त 'कॅलिस्थेनिक्स' म्हणजेच स्वतःच्या शरीराच्या वजनाचा वापर करून कसरत करतो.


समीरला कळेना. त्याने विचारले, ते कसं काय? विनायकरावांनी त्याला गावाबाहेरच्या एका मैदानावर नेले. तिथे एक जुने वडाचे झाड होते. विनायकरावांनी झाडाच्या एका मजबूत फांदीला धरून सहज १०-१२ पुल-अप्स काढले. मग जमिनीवर येऊन वेगवेगळ्या पद्धतीचे पुश-अप्स, स्कॅट्स आणि खांबाला धरून मानवी ध्वजासारखे शरीर हवेत तोलून दाखवले. हे सगळे करण्यासाठी त्यांनी एकाही लोखंडी वजनाचा वापर केला नव्हता.

ते म्हणाले, समीर, जेव्हा तू बाहेरील वजने उचलतोस, तेव्हा तू फक्त एका विशिष्ट स्नायूला ताकद देतोस. पण जेव्हा तू स्वतःच्या शरीराचे वजन हवेत तोलतोस, तेव्हा तुझे मन, मेंदू आणि शरीराचा प्रत्येक स्नायू एकत्र काम करतो. यालाच खरी ताकद, लवचिकता आणि संतुलन म्हणतात. आपल्या भाषेत यालाच आपण 'जोर-बैठका' किंवा 'कसरत' म्हणतो.

समीरला विनायकरावांचे बोलणे मनापासून पटले. त्याला समजले की साधनांची कमतरता हे केवळ एक कारण आहे, खरी गरज आहे ती इच्छाशक्तीची. त्या दिवसापासून त्याने विनायकरावांच्या मार्गदर्शनाखाली मैदानावरच कॅलिस्थेनिक्सचा सराव सुरू केला. झाडाच्या फांद्या, जमिनीचा सपाट भाग आणि जुने खांब हेच त्याचे साधन बनले. काही महिन्यांच्या कठोर परिश्रमानंतर, समीरचे शरीर कमालीचे सुदृढ, चपळ आणि शक्तिशाली झाले.

तात्पर्य : यशस्वी होण्यासाठी किंवा स्वतःचा विकास करण्यासाठी नेहमी महागड्या साधनांची किंवा बाह्य मदतीची गरज नसते. आपल्याकडे जे उपलब्ध आहे-मग ते आपले शरीर असो वा बुद्धी-त्याचा योग्य आणि योग्य पद्धतीने वापर करण्याची जिद्द असेल, तर आपण कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो. खरी ताकद साधनांमध्ये नसते, तर ती तुमच्या स्वतःच्या प्रयत्नांमध्ये असते.

## आत्मशक्ति



### कर्मांची मीमांसा

हे प्रेम सोडावे, असे त्यांना वाटेना! त्या ज्योतिपुरुषाने त्या माणसांच्या चांगल्या-वाईट कर्मांची मीमांसा केली. त्यांनी कितीही वाईट कामे केलेली होती, तरीही त्या ज्योतिपुरुषाने त्यांना भरभरून प्रेम दिले. आपल्या आयुष्यात प्रथमच त्यांनी स्वतःच्या अंतःकरणात खोलवर प्रेमात डुबकी मारल्याचा अनुभव घेतला. जरी ह्या ज्योतिपुरुषाचे प्रेम हे जगातील प्रेमापेक्षा वरचढ असले तरी ते परमेश्वराच्या प्रेमाचा एक अंश मात्र आहे. परमेश्वराच्या प्रेमाची तर आम्हाला कल्पनाही करता येणार नाही. ज्योतिपुरुषाचे प्रेम हे परमेश्वराच्या प्रेमाचा एक अंश आहे. आत्मासुध्दा त्या प्रेमाचा तसाच एक अंश आहे. आमच्या अंतरी परमेश्वराचा अंश या प्रेमाच्या रुपाने रहातो ! प्रेम हा त्याचा सहजस्वभाव आहे. हे अमर्याद प्रेम आमच्या अंतरी नेहमीच राहते. आम्ही ह्या प्रेमाची विशालता कशी ओळखावी? सर्व संत, साधु, सुफी आणि प्रगल्भ महापुरुष या प्रेमाची महती गातात. आम्ही येशू ख्रिस्त, हज़रत मोहम्मद, गौतम बुद्ध, महावीर, गुरु नानक, कबीर, मिराबाई, राबिया बसरी, बाबा फरीद अविलाची संत टेरेसा, संत जॉन ऑफ क्रॉस वा इतर महापुरुषांच्या रचना वाचल्या तर आम्हाला स्पष्ट होईल की, आत्म्याचा अनुभव घेऊन आम्हीही हे निर्मळ प्रेम प्राप्त करू शकतो. सुफी परमेश्वराला प्रियकर ह्या भूमिकेतून पहातो आध्यात्मिक अशा गद्य वा पद्य रचनेतून आत्मा व परमात्मा ह्यांचे परस्पर संबंध समजण्यासाठी प्रेयसी आणि प्रियकर ह्यांचे उदाहरण घेतलेले आहे. जरी वरवर पहाता प्रियकर-प्रेयसी वेग-वेगळे दिसतात तरी शेवटी ते एकरूप होतात. असेच आत्मा आणि परमात्मा एकच आहेत. आत्मा जरी सुरुवातीला स्वतःस परमात्म्यापासून वेगळा समजतो, तरी आध्यात्मिक प्रवास करतांना शेवटी आत्म्याला स्पष्ट होते की, तो परमात्म्याचा एक अंश आहे. आत्मिक यात्रा ही परमेश्वरापासून आत्मा अलग झाल्यापासून तर परत त्याच्याशी (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांनी इतरांचे केलेले सशक्तीकरण

सुरेश ओबेरॉय :

आपण जेव्हा आपल्या पद्धतीने गोष्टी केल्या तेव्हा आपणही चुका केल्या.

शिवानीदीदी :

जेव्हा आपण इतरांचं सशक्तीकरण करतो आणि त्यांना पुढे चालण्याची प्रेरणा देतो तेव्हा आपल्यातून शक्ती प्रवाहित होते. हे केवळ शब्दांतून संपूर्णतः समजणार नाही, आपल्याला हे प्रत्यक्षात करून बघावं लागेल.

सुरेश ओबेरॉय :

मी हे केलं आहे. जेव्हा माझा पुतण्या मोठा होत होता तेव्हा आम्ही आर्थिक निर्णय घेताना त्याचं मत विचारायचो. त्यामुळे तो त्याविषयी आधी अभ्यास करायचा आणि मग मत द्यायचा. यामुळे तो सशक्त झाला आणि आज तो त्याचं ऑफिस चालवतो.

शिवानीदीदी :

कधीकधी आपण इतरांना जबाबदारी देतो पण वारंवार त्यात हस्तक्षेप करत राहतो.

सुरेश ओबेरॉय :

मला ठाऊक होतं तुला हे जमणार नाही, असंही आपण बोलतो. शिवानीदीदी : कधीकधी आपण म्हणतो, तुला इतक्यांदा सांगूनही तू हे काम असंच करणार असशील तर मग ते काम मी केलं असतं तर बरं झालं असतं. पण आपण ते काम अनेकदा केलेलं आहे आणि आता इतरांना संधी द्यायची वेळ आहे.

इतरांना प्रोत्साहन देणं आणि त्यांना त्यांच्या प्रवासात पुढे जायला मदत करणं हा मनुष्यस्वभाव आहे. ह्या छोट्या छोट्या गोष्टींचे प्रयोग आपण कामाच्या ठिकाणी करू शकतो. इतरांना बळ दिल्याने आपल्याला आपोआपच खूप आशीर्वाद

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

चिंटू : आई, आपण देवाचे फोटो का लावतो?

आई : कारण देव आपल्याला वाचवतो.

चिंटू : मग बाबांनी घरात तुझा फोटो का लावलाय?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'सिंधू संस्कृती'मधील सर्वात मोठे स्नानगृह कुठे सापडले आहे?

– मोहेंजोदडो (सध्या पाकिस्तानात)

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### मुतखडा

त्याचबरोबर त्याच्या शेंगाना डिंगऱ्या असे म्हणतात. याचीही भाजी बनवून खाल्ली जाते. अशा प्रकारे मुळ्याचे सर्व भाग उपयोगी पडतात.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : मुळा दीपक, पाचक, त्रिदोषशामक, कटू रसात्मक, उष्ण वीर्यात्मक, रूक्ष, रुचकर असा असतो.

आधुनिक शास्त्रानुसार : मुळ्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, क व ब जीवनसत्त्वे, आर्द्रता, प्रथिने, मेद, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ हे सर्व औषधी घटक विपुल प्रमाणात असतात.

उपयोग :

१) मुळा अग्निप्रदीपक असल्यामुळे जेवताना चांगली भूक लागण्यासाठी व घेतलेला आहार पचण्यासाठी त्याच्या चकत्या करून त्या जेवणासोबत कच्च्या खाव्यात. याने जेवणाची लज्जतही वाढते व घेतलेला आहार चांगला पचतो.


२) मूतखड्याचा त्रास होत असेल, तर मुळ्याच्या पानांचा रस काढून दिवसातून दोन वेळा तो रस अर्धा ग्लास प्यावा. हा प्रयोग सलग काही दिवस केल्यास मूतखडा विरघळतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

न लगती सायास जावे वनांतरा ।
सुखें येतो घरा नारायण ।।



हा जगदगुरु संत तुकाराम महाराजांनी दिलेला संदेश. आमच्या सर्वच संतांनी समाजापूढे भक्ती कशी करावी याचा आदर्श ठेवलाय. पूर्ण भक्तीभावाने एकाग्रतेने नामस्मरण करण्यास सांगितलेय. समोर असलेली परिस्थिती स्विकारत कर्तव्य पालन करण्यास सांगितलेय. यामुळेच संत सावता माळी यांना भेटायला प्रत्यक्ष पांडुरंग अरण गावात आले.

वारकरी.. जे समाज व्यवस्था शिस्तीत.. सुख.. शांततेत.. आनंदाने चालण्यास.. समाज स्वास्थ्य टिकविण्यास मदत करतात असा लाखोंचा समुह.

वारकरी हे इतिहासातून जे जे उत्तम तेवढेच घेतात. ते ना कधी प्रतिवाद करत नाहीत. सदैव वादविदापासून दूर राहतात. भेदाभेद मानत नाहीत. सर्व संत समान मानतात. हे संस्कार त्यांनी आत्मसात केलेत संत मंडळींच्या जीवन चरित्रातून.

आज तेराशे वर्ष वारी परंपरा सुरू आहे. जेव्हा केव्हा निसर्गाची साथ मिळत नाही तेव्हा वारकरी 'ईश्वरेच्छा' म्हणून स्विकारतात. परिस्थीतीचे भान राखत प्रशासनाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करतात. कोरोना काळातही हे आपण अनुभवले.

यंदा अतिवृष्टीने पूर संकट उद्भवले आहे. त्यामुळे वारकरी मंडळी पालखी सोहळा सुरळीत संपन्न व्हावा यासाठी संत उपदेशाचे पालन करीत प्रशासनास मदत करत आहेत.

भागवत धर्माचे कळस ठरले ते संत तुकोबा. ते भक्ती मार्गाचे प्रदीक. त्यांनी नामाने ईश्वर प्रेमाची अत्युच्च पातळी गाठलेली होती. षड्रिपु विजय प्राप्त झाल्याने अंतःकरण पवित्र झाले होते. ते प्रतिभेचे धनी पण त्यांनी त्रास देणाऱ्या विषयी अपशब्दही काढला नाही. जगात कुणाविषयी शत्रूभाव नव्हता तर सर्वाविषयी प्रेमच होते. दुष्काळात त्यांनी स्वतःची सर्व संपत्ती वाटून टाकली.

संत तुकोबा निस्वार्थ.. निस्संग.. निस्पृह कर्मयोगी भक्त होते. तुकोबांना विठ्ठल भेटीची एवढी ओढ होती की त्यांनी ती शब्दात मांडताना ते त्यासाठी भुकेल्या चकोराची, माहेरी जाण्यासाठी आतुर लेकीची, आईसाठी आकांत करणाऱ्या भूकेल्या बाळाची त्याला उपमा देतात.

भेटी लागी जीवा लागलीसे आस, पाहे रात्रंदिवस वाट तुझी

जगद्गुरु संत तुकाराम मह अभंग म्हणजे विरहिणीच्या मनाची अवस्था आहे. तुकोबा स्वतःला 'भक्त' म्हणवून घेत नाहीत, 'विरहात आकुल झालेल्या जीव' म्हणून साद घालतात.

देवा, तुझ्या 'भेटीची' माझ्या जीवाला खूप 'आस' लागली आहे. मी 'रात्र-दिवस' फक्त 'तुझीच वाट' पाहत आहे.

आयुष्यात एकदा तरी पंढरपूरची वारी जरूर करा...

वारी ही फक्त चालण्याची वाट नाही... ती विठ्ठलाच्या प्रेमात स्वतःला विसरण्याची साधना आहे. मी मागील वर्षी सपत्नीक आळंदीहून माऊलीच्या पालखी समावेत २२ दिवस पंढरीची वारी केली.

आयुष्यात पैसा कमावला, घर बांधले, गाडी घेतली, नाव कमावले... पण मनाला खरी शांती मिळाली का?

हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला एकदा तरी विचारायला हवा.

आपण रोज संसार, नोकरी, व्यवसाय, जबाबदाऱ्या, चिंता आणि धावपळीत इतके गुंतून जातो की स्वतः साठीही वेळ राहत नाही. मन थकते, शरीर थकते आणि आत्मा शांततेचा शोध घेत राहतो.

पण एक अशी वाट आहे, जिथे पाऊल ठेवताच मन हलके होते... डोळे आपोआप भरून येतात... आणि प्रत्येक श्वासाबरोबर फक्त एकच नाम ओठांवर येते... ज्ञानेश्वर माऊली.

रामकृष्ण हरी... रामकृष्ण हरी... विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल... हीच आहे पंढरपूरची वारी.

वारीमध्ये ना आलिशान घर असते, ना मऊ गादी, ना एसी, ना कोणत्याही प्रकारच्या सुखसुविधा. तरीही लाखो वारकरी आनंदाने शेकडो किलोमीटर चालत राहतात.

कारण त्यांना सुखसुविधा नको असतात... त्यांना फक्त विठ्ठल हवा असतो.

वारीतील सर्वात सुंदर गोष्ट म्हणजे प्रत्येक वारकऱ्याच्या मुखात अखंड नामस्मरण असते. टाळ, मृदंग, वीणा आणि भगव्या पताकांच्या साक्षीने संपूर्ण दिंडी एकाच स्वरात गात असते..

रामकृष्ण हरी... रामकृष्ण हरी... ज्ञानोबा माऊली... तुकाराम... विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल... या नामघोषाने वातावरण इतके पवित्र होते की काही क्षणांसाठी संसारातील सर्व चिंता, दुःख आणि ताण विसरून जातो. मनात एकच भावना उरते- विठ्ठला, मला तुझ्या चरणी ठेव. वारीत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते.. आपण चालत असतो, पण चालवणारा विठ्ठल असतो.

जेव्हा पाय दुखायला लागतात, तेव्हा नामस्मरण शक्ती देते. तहान लागते, तेव्हा कुणीतरी पाणी घेऊन उभा असतो. भूक लागते, तेव्हा महाप्रसाद मिळतो. विश्रांतीची वेळ आली की कुणीतरी प्रेमाने जागा देतो.

तेव्हा जाणवते... या वारीत प्रत्येक वारकरी म्हणजे चालता-बोलता विठ्ठलच आहे.

वारीमध्ये श्रीमंत-गरीब, जाती-पाती, उच्च-नीच असा कोणताही भेद राहत नाही. सर्व जण एकमेकांना माऊली म्हणून हाक मारतात. प्रेम, सेवा, समता आणि भक्ती यांचे जिवंत रूप म्हणजे वारी. हा अनुभव मी स्वतः घेतला आहे

अनेक वारकरी सांगतात की वारीत चालताना थकवा जाणवत नाही. कारण प्रत्येक पावलावर विठ्ठलाची कृपा, संतांचा आशीर्वाद आणि नामस्मरणाची ऊर्जा सोबत असते. डोळ्यांतून वाहणारे अश्रू दुःखाचे नसतात... ते विठ्ठल भेटीच्या आनंदाचे असतात.

हे प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे माझी पत्नी सौ. शारदा देशपांडे तिला संधीवाताचा त्रास असतानाही सलग २२ दिवस दिंडी समावेश चालली..

आयुष्यात एकदा तरी पंढरपूरची वारी अवश्य करा. कदाचित तुम्ही विठ्ठलाला भेटण्यासाठी जाल... पण परतताना स्वतःलाच नव्याने भेटाल.

तुम्ही कधी वारी केली आहे का? केली नसेल तर आयुष्यात एकदा वारीला जा....



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## ...करी लाभाविण प्रीती।

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स




ही दोन भावांची कहाणी. दोघांचीही साधी राहणी. शेतीची दोघं मिळून करायचे पाहणी. येणाऱ्या पिकाची करीत समान वाटणी.

आज वाटणीचाच दिवस होता. शेतात ज्वारीचा भला मोठा ढीग होता. त्याचे समान दोन भाग केले. तेवढ्यात दुपार झाली. मोठा भाऊ जेवायला घरी गेला. इकडे लहान भावाने विचार केला, दादाचे कुटुंब मोठे. त्याला पैशाची अधिक गरज. पन्नास मण ज्वारी दादाच्या ज्वारीच्या ढिगात गुपचूप मिसळून देउ. दादा जास्तीचे घे म्हटले तरी घेणार नाही. लहान भावाने आपल्या ढिगातली पन्नास मण ज्वारी मोजली आणि दादाच्या ज्वारीत मिसळली. त्याला खूप समाधान वाटले. दादा जेवून परतला. लहान भाऊ घरी जेवायला गेला.

इकडे मोठ्या भावाच्या मनात आलं. की लहान भावाचं नुकतंच लग्न झालं. त्याचा वाढता संसार. भविष्याची तरतूद तो कशी करणार? एवढ्या ज्वारीत कुटुंब पोसणार, की थोडीफार शिल्लक टाकणार? तेव्हा त्याने आपल्या ज्वारीच्या ढिगातली पन्नास मण ज्वारी मोजली आणि लहान भावाच्या ज्वारीच्या ढिगात मिसळून दिली. मग त्याला खूप समाधान वाटलं. असंच असतं. प्रेम महाभारतातील प्रजागर पर्व सांगत. कर्मणा मनसा वाचा यदभीक्षणं निषेवते। तदेवापदरत्येनं तद्धेद प्रीतिलक्षणम ।।

ज्याच्यावर करायचं प्रेम, त्याच्या बाबतीत पाळायचा नेम. त्याच्या भल्याचाच सदा विचार. त्याचं कल्याण होईल, असाच सदैव आचार. तो न दिसावा कधी लाचार. खऱ्या प्रेमाचा हाच प्रकार. मग मनातलं दुःख टळतं. मन आनंदान बहरून येतं. केवढं समाधान चेहऱ्यावर फुलतं. प्रेम हीच पुरुषाला प्रतिष्ठा. इतरांच्या भल्यासाठी प्रयत्न करा. संत तुकाराम म्हणतात. मोजुनी झिजलो मापायीचे परी। जाळावी हे थोरी लाभाविण ।

मापानं धान्य मोजलं. मोजताना माप धान्यानं भरलं, पण लगेच हे धान्य दुसऱ्याच्या पदरात टाकलं, की मापाजवळ काय उरलं? घ्यायचं ते दुसऱ्याला लगेच द्यायचं, जवळ का ठेवायचं? छे! असं इतरांसाठीच प्रयत्नरत राहायचं. त्यात केवढं सुख लाभायचं. हेच मोठेपणाचं लक्षण म्हणायचं. एरव्ही काय त्या प्रतिष्ठेला जाळायचं? करायचं दुसऱ्याचं समाधान, हाच प्रेमाचा अभिमान. समर्थ रामदास स्वामी म्हणतात. परपीडेचे वाहे दुःख परसंतोषाचे सुख । वैराग्य देखोन हरिख। मानी तो प्रेमगुण ।।

प्रेम हा सगुण दुःख हरोनी फेडावे प्रेमाचे ऋण. दुसऱ्याला संतोष द्यावा मग लाभेल सुखाचा ठेवा. केवळ स्वार्थ पाहणे, हे त्वरित टाकणे. आपल्याच भल्याचे कधी न पाहणे. यामुळे केवढा आनंद लाभणे, जो प्रेम करी, त्याला कशाचे उणे ? संत नामदेव म्हणतात. प्रेमाचा कफ चढावा। त्रैलोकी आनंद वाढावा । प्रेमपिसे भरले अंगी । गीत संगे नाचो रंगी ।। कोणेवेळे काय गाणे। हे तो भगवंता मी नेणे।।

प्रेमापायी पिसे झाले नामदेव. गाणे गाती प्रेमाचे. प्रेमरंगी सदा नाचती. नाव नसे स्वार्थाचे, मग भान कुठले कशाचे ? फक्त प्रेम उधळायचे। काळ, वेळ का त्यासाठी पाहायचे? प्रेम कसे करू, हे का शोधायचे ? प्रेम तर उत्स्फूर्त व्हायचे. आणि ते व्हायचे ते इतरांनाच जाणवायचे, स्वतः ला त्याचे ज्ञान नसायचे। सदा प्रेम ज्याच्या पोटी। त्याचा दास होई जगजेठी ।।

**- किशोर गांधी**

# अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्यावतीने संत निवृत्तीनाथ पालखी सोहळ्यात सेवा उपक्रम

नगर - आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर येथे आगमन होताच अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने मार्केट यार्ड परिसरात वारकरी सेवा उपक्रम राबविण्यात आला. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल सेवा या भावनेतून सुमारे ८ ते ९ हजार वारकरी बांधवांना पिण्याचे थंड पाणी, राजगिरा लाडू, बिस्किटे तसेच अल्पोपहाराचे निस्वार्थ वाटप करण्यात आले.

या सेवाकार्यात राहुरी-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षय कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे, मार्केट कमिटीचे चेअरमन भाऊसाहेब बोठे तसेच संचालक मंडळातील सदस्यांनी उपस्थित राहून वारकऱ्यांची सेवा केली व स्वयंसेवकांचे मनापासून कौतुक केले.



उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनोज सोनवणे, अशोक गाढे, संदीप नवसुपे, भरत सुंबे, सिद्धांत पानसरे, निलेश सुंबे, संतोष बेरड, संजय शिंदे, अनुराधाताई येवले, सागर भोसले, शशिकांत भांबरे, गणेश नाईकनवरे, मयूर पवार, चि. मित गाढे, विलास तळेकर, सोमनाथ गुंड, मिलिंद जपे, महादेव कोतकर, संदीप जगताप, राम जरांगे, भरत भोसले, कु. शुभरा भोसले, अक्षय तोडमल, श्रीपाद दगडे, गजेंद्र दांगट, चि. रितेश सोनवणे, वैभव भोगडे, जगू निमसे तसेच सिव्हिल हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने अथक परिश्रम घेतले.

या सेवा उपक्रमासाठी खासदार निलेश लंके व नवले मेडिकलचे पंकज गुलाब जपे हातवळण तसेच पादीर, केडगाव यांचे सहकार्य लाभले.

वारकरी बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान, त्यांच्या मुखातून अखंड घुमणारा विठ्ठल... विठ्ठल... चा गजर आणि स्वयंसेवकांची निस्वार्थ सेवा यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

# वारकऱ्यांच्या भक्तिभावात पांडुरंगाचे दर्शन होते

## प्रसाद गांधी यांचे प्रतिपादन; मर्चंटस् बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने वारकऱ्यांची सेवा

नगर - पंढरीचा आषाढी वारी पायी दिंडी सोहळा हे महाराष्ट्राचे आध्यात्मिक व सांस्कृतिक वैभव आहे. आषाढी एकादशी निमित्त अहिल्यानगर शहरामधून पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीमधील वारकरी बंधू-भगिनींची सेवा करण्याची संधी मिळते ही अतिशय आनंदाची बाब आहे. वारकऱ्यांमध्ये पांडुरंगास पाहिले जाते. मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या प्रेरणेतून दरवर्षी वारकऱ्यांची सेवा करण्याचा आनंद मिळतो. वारकऱ्यांच्या भक्तिभावात पांडुरंगाचे दर्शन होते, अशा भावना अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेचे कर्मचारी प्रतिनिधी संचालक प्रसाद गांधी यांनी केले.



आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा नगर शहरातील मार्केट यार्ड येथे हनुमान मंदीराच्या प्रांगणात मुक्कामी होता. मर्चन्टस् बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी बंधू-भगिनींना राजगिरा लाडू, चिवडा भेट देण्यात आला.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा नगर शहरातील मार्केट यार्ड येथे हनुमान मंदीराच्या प्रांगणात मुक्कामी होता. मर्चन्टस् बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी बंधू-भगिनींना राजगिरा लाडू, चिवडा भेट देण्यात आला. यावेळी गांधी बोलत होते. सहमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी यांच्या हस्ते वारकऱ्यांना ही भेट देण्यांत आली.

यावेळी कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, सीमा भंडारी, किशोर चोपडा, महेंद्र फिरोदिया, संतोष कटारिया, रामप्रसाद सारडा, योगेश गुगळे, अमित सोनग्रा, निलेश चंगेडिया, धीरज फिरोदिया, चेतन लोढा व सर्व कर्मचारी होते.

नितीन भंडारी म्हणाले की, आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक पंढरपुरला पायी मार्गक्रमण करीत असतात. ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता केवळ विठुरायाच्या दर्शनाची ओढ असते. अशा वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य मर्चंटस बँकेच्या कर्मचाऱ्यांना लाभते. बँकेत कर्तव्य बजावताना जो सेवाभाव असतो तोच सेवाभाव कर्मचारी वारकरी सेवेत दर्शवतात. त्यामुळे प्रत्येकाला आध्यात्मिक ऊर्जा प्राप्त होते. बँकेच्या नगरमधील सर्व शाखांचे कर्मचारी वृंदांनी एकत्रित येऊन वारकरी बंधू-भगिनींना उपयुक्त भेट देण्याचे नियोजन केले. पांडुरंगानेच त्यांच्याकडून ही सेवा करवून घेतली. याकरिता बँकेचे चेअरमन संजय चोपडा, व्हाईस चेअरमन अमित मुथा यांच्यासह संचालक मंडळाचे सहकार्य लाभले.



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# 'पद्मशाली सोशल फाउंडेशन' तर्फे वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप

नगर - आषाढी वारीनिमित्त कल्याण रोड, जिजाऊनगर, अहिल्यानगर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या पद्मशाली मार्कंडेय महामुनी दिंडी सोहळा ट्रस्टच्या वारकऱ्यांसाठी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पंढरपूरकडे निघालेल्या दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांना राजगिरा लाडू, वेफर्स आणि पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. भक्तिमय वातावरणात, विठ्ठल नामाच्या गजरात आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात हा सेवा उपक्रम पार पडला. वारकऱ्यांनीही ट्रस्टच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक करत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. यावेळी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लक्षेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, वरद लक्षेट्टी, श्रावणी लक्षेट्टी तसेच ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य आणि सहकार्यकर्ते उपस्थित होते.



यशवंत गाडे विद्यालयातील स्काऊट - गाईडच्या पथकाने एक दिवस दिंडी सोबत हा उपक्रम राबवला. यात सहभागी झालेले विद्यार्थी व शिक्षक.

# शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवला 'एक दिवस दिंडीसोबत'; यशवंत गाडे विद्यालयातील स्काऊट -गाईडचा उपक्रम

नगर - पंढरपूरच्या वारीतील दिंडी हा वारकरी संप्रदायाचा आत्मा आहे. टाळ-मृदुंगाचा गजर, मुखी 'ज्ञानोबा-तुकाराम' नामस्मरण, डोक्यावर तुळशी वृंदावन, आणि खांद्यावर भगवी पताका यामुळे भक्तीचा आणि आनंदाचा एक वेगळाच संगम शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवला.

मुकुंदनगर येथील यशवंतराव गाडे विद्यालयातील स्काऊट - गाईडच्या युनिटच्या वतीने एक दिवस दिंडी सोबत उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शाळकरी मुलांनी दिंडीतील वयोवृद्ध वारकऱ्यांची सेवा करून त्यांना चहा, पाणी तसेच अल्पोपहार दिला. वारीत जात, पात, किंवा आर्थिक भेद नसतो, सर्वजण एकमेकांना नम्रतेने ' माऊली ' संबोधतात. चालताना होणारे विठ्ठलाचे नामस्मरण आणि दुपारच्या विसाव्यात होणारे हरिपाठ-कीर्तन मनाला असीम शांतता आणि आनंद देतात. दिंडीतील वारकरी अनोळखी असूनही एकमेकांची प्रेमाने विचारपूस करतात आणि सुख-दुःख वाटून घेतात.

वारी दरम्यान होणाऱ्या गोल आणि उभ्या रिंगणात वारकरी आनंदाने नाचतात, काही दिंड्यांमध्ये पारंपारिक लोकनृत्य आणि फुगडी खेळून आनंदोत्सव साजरा केला जातो. याचा प्रत्यक्ष अनुभव व धडे शाळकरी मुलांनी घेतला. मुले देहभान हरपुन दिंडीतील वारकऱ्यांसोबत फुगडी खेळले. मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी या उपक्रमाचे आयोजन केले. यावेळी सुरेखा आठरे, मनिषा मगर, भाऊसाहेब काकडे, योगेश गुंड, किशोर चाबुकस्वार, सुनील पवार आदि या दिंडीत सहभागी झाले होते.

# 'माऊली... पाणी घ्या!' मुस्लिम बांधवांच्या सेवाभावाने भारावली ज्ञानेश्वर पालखी दिंडी

नगर - श्रीक्षेत्र नेवासाहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री ज्ञानेश्वर पालखी सोहळा दिंडीचे शहरातील मुस्लिम समाज आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशन यांच्या वतीने कोठला येथे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात आणि विठ्ठल नामाच्या घोषात दिंडीचे आगमन झाले. हातात पाण्याच्या बाटल्या आणि अल्पोपहार घेऊन उभे असलेले युवक प्रत्येक वारकऱ्याला प्रेमाने हाक मारत होते. माऊली... पाणी घ्या... अल्पोपहार घ्या.... हा सेवाभाव पाहून अनेक वारकरी भारावून गेले. दिंडीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांनीही मुस्लिम बांधवांनी केलेल्या आदरातिथ्याला प्रतिसाद दिला. अनेकांनी प्रेमाने हस्तांदोलन करुन बंधुभावाचे दर्शन घडविले. काही क्षणांसाठी धर्म, जात, पंथ, भाषा यांचे सर्व भेद विरघळून गेले आणि अवघे एकचि झालो आपण हा संतविचार प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला.



पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री ज्ञानेश्वर पालखी सोहळा दिंडीचे शहरातील मुस्लिम समाज आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशन यांच्या वतीने कोठला येथे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत करण्यात आले.

## मुस्लिम समाजातील युवकांकडून दिंडीचे स्वागत

या उपक्रमात साहेबान जहागीरदार, नगरसेवक हाजी शहबाज, मुज्जू शेख, सुशांत म्हस्के, मोहसीन शेख, अकबर अली, दानिश शेख, शाहनवाज शेख, शाकिर शेख, शहबाज बॉक्सर, जाकीर तांबोळी, अकदस शेख, साजिद शेख आदी सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना साहेबान जहागीरदार म्हणाले, वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. प्रत्येक वारकरी जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन विठ्ठलभक्ती करतो. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीतून संपूर्ण मानवजातीला प्रेम, समता आणि मानवतेचा संदेश दिला. इस्लाम धर्मदेखील करुणा, प्रेम, सेवा आणि बंधुभाव शिकवतो. त्यामुळे संत आणि सुफी परंपरेचा मूलभूत संदेश एकच आहे माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे. ते पुढे म्हणाले, आज काही प्रवृत्ती समाजात जाती-धर्माच्या नावाने भिंती उभ्या करण्याचा प्रयत्न करतात. पण महाराष्ट्राची खरी ओळख ही संत, सुफी आणि समाजसुधारकांच्या समन्वयाच्या विचारात आहे. या भूमीने अनेक सुफी-संतांची शिकवण जपली आहे. प्रेमाचे पूल बांधणे आणि द्वेषाच्या भिंती पाडणे हीच काळाची गरज आहे. या छोट्याशा सेवाभावी उपक्रमातून आम्ही धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय ऐक्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले.

# नगरमध्ये १७ जुलै रोजी 'नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा'

नगर – अहिल्यानगरच्या लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, एसटी स्टँड रोड येथे १७ जुलै रोजी तीसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय सतराशे पेक्षा कमी मानांकित खेळाडूंसाठी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाअध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली.

या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगाना इत्यादी राज्यातून तीनशे च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. लौकरच येणारा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस तसेच गुरुपौर्णिमा याचे औचित्य साधून वरील स्पर्धा आयोजित केली आहे. नरेंद्र फिरोदिया यांनी आजपर्यंत बुद्धिबळा साठी दिलेल्या योगदानाला वंदन म्हणून त्यांच्या नावाची ही तीसऱ्यांदा स्पर्धा आयोजित होत आहे असे अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

साडेचार वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपल्या बुद्धीचे बळ पणाला लावणार आहेत.

१७ जुलै रोजी सकाळी १० वाजता ह्या स्पर्धचे शुभारंभ होणार असून. त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. रविवारी दुपारी ४ वा. तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

स्पर्धेत विविध गटात पाच लाख रुपयांची प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ७० करंडक व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना पवन राठी (पुणे), शार्दुल टापसे (सातारा), दीपक चव्हाण (वाशिम), शिशिर इंदुरकर (नागपूर), प्रशांत घगेकर, देवेंद्र ढोकळे (नगर) आदी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे.

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे १०० लाकडी पट व सोगट्या हे राहणार आहे. १०० आंतरराष्ट्रीय दर्जाचे लाकडी पटांचा वापर भारत पहिल्यांदा होणार आहे. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, मनीष जसवानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, सचिन कांबळे (पाथर्डी), शिवा काळे (श्रीरामपूर), कु दुर्गा ढोकळे (शेवगाव), संकेत गाडे (कोपरगाव), संजय खडके, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, अतुल कोठारी, सौ. शुभदा ठोंबरे, डॉ. स्मिता वाघ, सौ. रोहिणी आडकर आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संपर्क यशवंत बापट ९३२६०९२५०१ व पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८.



बांधकाम कामगारांना शासनामार्फत साहित्याचे वाटप करण्यात आले. अ‍ॅड. युवराज शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे शंभर बांधकाम कामगारांना विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. (छायाचित्र – लहू दळवी)

# बांधकाम कामगारांना साहित्याचे वाटप

## शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न : अ‍ॅड. युवराज शिंदे

नगर – कल्याण रोड–शिवाजीनगर परिसरातील बांधकाम कामगारांना शासनामार्फत साहित्याचे वाटप करण्यात आले. अ‍ॅड. युवराज शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे शंभर बांधकाम कामगारांना विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

यावेळी अ‍ॅड. युवराज शिंदे म्हणाले की, शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. बांधकाम कामगारांना सुरक्षितपणे काम करता यावे तसेच त्यांच्या कौशल्याला अधिक चालना मिळावी, यासाठी शासनाने विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबांना आधार देण्याचे कार्य साध्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी माजी प्राचार्य खासेराव शितोळे, आयोजक अ‍ॅड. युवराज शिंदे, अजय चितळे, पारुनाथ ढोकळे, प्रा. भगवान काटे, एल. बी. म्हस्के, शिवाजी शिंदे, राजेंद्र शिंदे, देवा होले, अरुण ढाकणे, संभाजी चौधरी, गणेश बेरड, शेषराव आगळे, शंकर शिरसुल, सतीश लगड, पंडित हराळ, बाबासाहेब आंधळे, केशव चेमटे, सुधाकर बोल्ली, दत्तात्रेय मित्याल, पुंडलिक आरवडे, किशोर नावकार, रोहित काळोखे, विवेक खोसे, कोरडे सर आदी उपस्थित होते.

माजी प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले की, समाजातील गरजू व्यक्तींचे प्रश्न मार्गी लावणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. त्यांच्या सुखदुःखात धावून जाणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. बांधकाम कामगार हा कष्टकरी वर्ग असून त्यांच्या मदतीसाठी पुढे येण्याचे काम अ‍ॅड. युवराज शिंदे यांनी केले आहे. शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बांधकाम कामगारांनी अ‍ॅड. युवराज शिंदे यांचे आभार मानत, गरजेच्या वेळी मदतीला धावून आल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी चौधरी यांनी केले. शिवाजी शिंदे यांनी आभार मानले.

# लालटाकी येथे आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांचा पुतळा उभारणार

## नगरसेवक यांचे आश्वासन; महापालिका महासभेत ठराव मंजूर करण्याची ग्वाही; मातंग समाजाच्या ऐक्याचा शक्तिप्रदर्शन मेळावा



नगर – बोल्हेगाव परिसर सकल मातंग समाजाच्या वतीने आयोजित 'मातंग ऐक्य मेळाव्यात लालटाकी परिसरातील आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे चौकात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत उपस्थित सर्वपक्षीय नगरसेवकांनी जाहीर आश्वासन दिले. महापालिका महासभेत तातडीने ठराव मंजूर करून पुतळा उभारणीची प्रक्रिया मार्गी लावली जाईल, अशी ग्वाही लोकप्रतिनिधींनी दिली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी भीमराव साळवे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहन गाडे उपस्थित होते. यावेळी नगरसेवक कुमारसिंह वाकळे पाटील, नवनाथ कातोरे, ज्येष्ठ नगरसेविका आशाताई कातोरे तसेच दलित समाजाचे नेते किसन भिंगारदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्यात अ‍ॅड. प्रदीप सकट यांनी आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळा उभारणीसंदर्भातील कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. आवश्यक कायदेशीर पूर्तता झाल्यानंतर महानगरपालिका महासभेत रीतसर ठराव मंजूर करून पुतळा उभारण्याची मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली. या मागणीला उपस्थित नगरसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद देत महासभेत विषय मांडून पुतळा उभारणीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी वक्त्यांनी आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरवपूर्ण इतिहास उलगडला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण चळवळीत लहुजी वस्ताद यांनी दिलेले योगदान, नगरमधील कौठीची तालीम माळीवाडा परिसराशी असलेला ऐतिहासिक संबंध तसेच अन्यायाविरुद्ध त्यांनी उभारलेला संघर्ष यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.

मेळाव्याचे प्रास्ताविक भगवान जगताप यांनी केले.

संदीप सकट यांनी लहुजी वस्ताद यांच्या पुतळ्यासाठी सुरू असलेल्या संघर्षाचा आढावा घेतला.

शाम वैराळ यांनी बोल्हेगाव परिसरातील समाजबांधवांच्या योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विशाल पाचरणे यांनी केले.

समारोपप्रसंगी मातंग एकीकरण समितीचे उत्तर जिल्हाध्यक्ष रवींद्र शेलार यांनी आरक्षण उपवर्गीकरणाबाबत समाजाची भूमिका स्पष्ट केली. मातंग समाजाला न्याय्य प्रतिनिधित्व आणि हक्क मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असून, आगामी सर्व आंदोलनांमध्ये समाजाने एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या मेळाव्यास दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे, अनिल शेकटकर, नामदेवराव चांदणे, प्रतिबिंब सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दादू नेटके, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, जालिंदर शेलार, बाळासाहेब वाघमारे, सुनिल भोसले, दिनेश वैराळ, पावलस पवार, रामदास ठोकळ, रघुनाथ साळवे, राम वाघमारे, किशोर साळवे, वाल्मिक कसबे, सचिन कसबे, बबन जगधने, संदीप घोरपडे, सचिन लोखंडे, सचिन शिंदे, सुशील खंडागळे, सुशील साठे, योगेश महापुरे, बंडू साळवे, विनोद शिंदे, विकी वैराळ, विनोद शिंदे, रणजित वैरागर, सचिन शिंदे, संतोष शेंडगे, ताराचंद जगधने, किशोर साळवे, विजय वडगळे, गौरव घोरपडे, राहुल शेकटकर, विठ्ठल गाडे, लक्ष्मण साबळे, संजय उमाप, सचिन शेकटकर, अरुण डाके, संजय जगताप, लक्ष्मण शिंदे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. ताराचंद जगधणे यांनी आभार मानले.

# एमएसबीटीई उन्हाळी २०२६ डिप्लोमा परीक्षेत डॉ. पाऊलबुधे फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे सुयश

नगर – वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी एमएसबीटीई उन्हाळी २०२६ डिप्लोमा परीक्षेत प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.

प्रथम वर्ष डिप्लोमा परीक्षेत गायकवाड अंकिता डेव्हिड हिने ७६.३०% गुणांसह प्रथम क्रमांक, पठारे यश मायकल याने ७५.१०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर वारंगुळे अनुष्का सत्यनारायण हिने ७३.९०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. द्वितीय वर्ष डिप्लोमा परीक्षेत सय्यद मेहविश अदनान हिने ७८.९१% गुणांसह प्रथम क्रमांक, दरंदले श्रावणी संजय हिने ७७.९१% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर शेख बुशरा हमीद हिने ७७.४६% गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला.

डिप्लोमा इन फार्मसीचे प्राध्यापक व परीक्षा विभागप्रमुख आबिदखान पठाण यांनी प्रथम व द्वितीय वर्षाच्या एमएसबीटीई उन्हाळी २०२६ परीक्षेच्या निकालाची टक्केवारी व गुणवंत विद्यार्थ्यांची माहिती दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष राम बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुधे तथा सदस्य रघुनाथ कारमपुरी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच बी.फार्म.चे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी. फार्म.च्या प्राचार्या डॉ.अनुराधा चव्हाण, विभागप्रमुख डॉ.वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर, प्रा.स्वाती कडनोर तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# उपाध्याय प्रवर प्रवीणऋषीजी महाराजांचा समर्पण चातुर्मास भव्यदिव्य व अविस्मरणीय ठरणार

## सौरभ बोरा यांचे प्रतिपादन



नगरमध्ये २६ जुलैपासून सुरु होणाऱ्या उपाध्याय प्रवर प्रवीणऋषीजी महाराज यांच्या समर्पण चातुर्मासाच्या नियोजनासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज व उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराज यांची भेट घेऊन चर्चा केली.

नगर – आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी महाराजांच्या पावन सानिध्यात अहिल्यानगरमध्ये २६ जुलैपासून उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषी महाराजांचा समर्पण चातुर्मास होणार आहे. उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराजांचा हा अखेरचा चातुर्मास असल्याने त्यांनी आजपर्यंत जीवनात जे आध्यात्मिक ज्ञान मिळवले आहे ते सर्व या चातुर्मासात भाविकांना अर्पण करणार असल्याने यास 'समर्पण चातुर्मास' असे नाव देण्यात आले आहे. या चार महिन्यांच्या कालावधीत आनंदधाम येथे आबालवृद्धांसाठी विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होत स्वतःचे आध्यात्मिक ज्ञान वाढवून जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणावेत. उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराजांचे आजपर्यंत झालेले सर्व चातुर्मास त्यांच्या अत्यंत प्रभावी व मार्गदर्शक प्रवचनांमुळे देशात लोकप्रिय झाली आहेत. अशा महान तपस्वीचे सानिध्य लाभणे हे आपले भाग्याच आहे. त्यामुळे हा समर्पण चातुर्मास भव्यदिव्य व अविस्मरणीय ठरणार आहे, असे प्रतिपादन तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी केले.

आनंदधाम येथे येत्या २६ जुलैपासून उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराज यांच्या समर्पण चातुर्मासास प्रारंभ होत आहे. या चातुर्मासाच्या नियोजनाची बैठक सौरभ बोरा यांच्या उपस्थितीत नगरमध्ये पार पडली. त्यानंतर महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज व उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराज यांची सौरभ बोरा यांनी भेट घेऊन चर्चा केली. यावेळी दोन्ही महाराजांसह अलोकमुनी महाराजांनी हा चातुर्मास यशस्वी व संस्मरणीय होण्यासाठी विविध सूचना व मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले.

यावेळी कुंदनऋषीजी म्हणाले, नगरमध्ये उपाध्याय प्रवीणऋषी महाराजांचा चातुर्मासाची संपूर्ण जबाबदारी सौरभ बोरा यांनी उचलून उत्कृष्ट कार्य केले आहे. हा चातुर्मास सफल व सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारा ठरणार आहे, असे आशीर्वाद दिले.

प्रवीणऋषीजी महाराज म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या पावन भूमीत अहिल्यानगरमध्ये माझा हा समर्पण चातुर्मास होत असल्याचे समाधान व आनंद होत आहे. या चार महिन्यांच्या काळात भरगच्च आध्यात्मिक उपक्रमाचे आयोजन केले आहे. सौरभ बोरा व चातुर्मास समिती यांचे उत्कृष्ट नियोजन करत आहेत.

यावेळी चातुर्मास समितीचे संजय ताथेड, सुधीर मुनोत, सचिन देसार्डा, संतोष पिपाडा, तुषार पोट, ईश्वर बोरा, सचिन डुंगरवाल, पवन गुंदेचा, सचिन चोपडा, संतोष गांधी, नितीन चंगेडीया व शैलेश मुनोत व सौरभ बोरा मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# नगरमध्ये 'अहं गर्भ साधना' विशेष शिबिरांचे आयोजन



श्री ऋषीप्रविणजी महाराज

नगर – निरोगी, आनंदी आणि संस्कारक्षम पिढी घडवण्याच्या उदात्त हेतूने 'आनंदाश्रम'तर्फे आयोजित 'अहं गर्भ साधना' या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर येथे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. आनंदाश्रमचे संस्थापक आनंदऋषीजी महाराज यांचे शिष्य आणि 'अहं विज्ञाना'चे प्रणेते उपाध्याय श्री ऋषीप्रविणजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडणार आहे. सन १९९६ पासून सुरू असलेल्या या उपक्रमाचा लाभ गेल्या तीन दशकांत जगभरातील हजारो दांपत्यांनी घेतला असून, आता अहिल्यानगरमध्ये ही संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमांतर्गत २ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत परिचय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे, जे सर्वांसाठी मोफत आणि खुले आहे. त्यानंतर १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान अपत्य नियोजित करणाऱ्या आणि नवविवाहित दांपत्यांसाठी निवासी 'प्लॅनिंग' शिबिर होणार असून, १८ व १९ ऑगस्ट रोजी गर्भवती माता–पितांसाठी विशेष 'पॅरेंटहूड' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गर्भपूर्व नियोजनापासून ते आनंदी आणि तणावमुक्त गर्भावस्था, आई–बाळातील भावनिक नाते दृढ करणे, योग, ध्यान, सकारात्मक विचार आणि संस्कारक्षम पालकत्व यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर या शिबिरांमध्ये मार्गदर्शन केले जाणार आहे.

उपाध्याय श्री ऋषीप्रविणजी महाराज यांच्या प्रत्यक्ष सानिध्यात होणाऱ्या या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक दांपत्यांनी आनंदाश्रम, अहिल्यानगर येथे संपर्क साधून किंवा ८२०८२६८९०६ या क्रमांकावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय कनिष्ठ गट ज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे १ व २ ऑगस्टला आयोजन



नगर – अहिल्यानगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा (ज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स) अजिंक्यपद स्पर्धा २०२६–२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १ आणि २ ऑगस्ट रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे २७ ते ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणे बंधनकारक असून, २८ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर (https://register.smrsports.com/Competition/AhilyanagaršDistrictšJunioršAthleticsšMeetš2026)प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १४, १६, १८ आणि २० वर्षांखालील अशा चार वयोगटांचा समावेश असून, खेळाडूचे वय किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

खेळाडूंनी वय पडताळणीसाठी येथे येताना सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्माचा दाखला (ज्याची नोंदणी जन्मानंतर दोन वर्षांच्या आत झालेली असावी), १० वीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही मूळ कागदपत्रे सोबत आणणे गरजेचे आहे. १ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून स्पर्धा स्थळी ऑनलाइन नोंदणी केलेल्या खेळाडूंना चेस्ट नंबरचे वाटप केले जाईल. स्पर्धा संपल्यानंतर चेस्ट नंबर जमा केल्यावर सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तर वयाची पडताळणी झाल्यानंतर आणि संबंधित खेळ प्रकारात किमान ४ खेळाडू असल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

या स्पर्धेसाठी निवास व जेवण याची कोणतीही व्यवस्था आयोजकांकडून केली नसून, ती खेळाडू व पालकांनी स्वतः करावी लागणार आहे. तसेच स्पर्धेदरम्यान होणाऱ्या कोणत्याही दुखापतीला किंवा नुकसानीला असोसिएशन जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी खेळाडूंनी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६, सुजय बाबर ७५०७६८१७२६, यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# जैन ओसवाल पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद

## तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांचे प्रतिपादन; जैन ओसवाल पतसंस्थेस दिली सदिच्छा भेट



जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्थेस तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी सदिच्छा भेट देऊन पतसंस्थेच्या स्वमालकीची इमारत पाहून समाधान व्यक्त केले. तसेच यावेळी मर्चंट बँकेचे माजी संचालक व संस्थेचे सभासद अशोक पितळे यांचा वाढदिवसानिमित्त व सौरभ बोरा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

नगर – स्व.सुवालालजी गुंदेचा यांनी जैन ओसवाल पतसंस्थेचे लावलेले रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले दिसत आहे. समाजासाठी तसेच समाजातील व्यावसायिकांना आर्थिक मदत करून प्रोत्साहन देण्यासाठी सुरू झालेली ही पतसंस्था आज नावारूपाला आली आहे. जैन ओसवाल पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद आहे. उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा.यांचा समर्पण चातुर्मास हा भव्य दिव्य होण्यासाठी प्रत्येकाने या धार्मिक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी केले आहे.

जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्थेस तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी सदिच्छा भेट देऊन पतसंस्थेच्या स्वमालकीची इमारत पाहून समाधान व्यक्त केले. तसेच यावेळी मर्चंट बँकेचे माजी संचालक व संस्थेचे सभासद अशोक पितळे यांचा वाढदिवसानिमित्त व सौरभ बोरा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, समीर बोरा, चेतन भंडारी, विनीत बोरा, अ‍ॅड. आनंद फिरोदिया, शरद गोयल, शांतीलाल गुगळे, परेश बोरा, आदींसह पतसंस्थेचे माजी चेअरमन शैलेश मुनोत, प्रकाश रामलाल गांधी, नितीन चंगेडे, प्रमोद डागा, प्रतीक बोगावत, प्रशांत गांधी, आनंद मुथ्था, सुधीर मुनोत, बाबालाल गांधी, सचिन डुंगरवाल, प्रशांत गवळी, संतोष पिपाडा, संजय ताथेड, नितीन मुनोत, गणेश गवळी, सुनील लोढा आदी उपस्थित होते.

अशोक पितळे म्हणाले, सौरभ बोरा यांनी वडिलांचा पारंपारिक व्यवसाय न करता मुंबई येथे जाऊन मोठ्या जिद्दीने वीस वर्षात मोठी प्रगती केली आहे. सौरभ बोरा यांचे जागतिक स्तरावर उद्योजक म्हणून चांगला नवलौकिक आहे. तरीदेखील नगरच्या मातीशी असलेले घटना नाते त्यांनी तुटू दिले नाही. आजही नगरची नाळ त्यांची जोडलेली आहे. शहराच्या धार्मिक सामाजिक तसेच सांस्कृतिक कार्यात त्यांचा नेहमीच सहयोग मिळत आहे. नगर शहरात होणाऱ्या समर्पण चातुर्मास या कार्यक्रमासाठी सौरभ बोरा यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. सौरभ बोरा हे एक आदर्श व्यक्ती म्हणून तरुणांसाठी नेहमीच मार्गदर्शक असे ठरणार आहेत. त्यांनी समाजातील युवकांना मार्गदर्शन करावे.

व्हाईस चेअरमन शैलेश गांधी म्हणाले, सौरभ बोरा यांनी जैन औसवाल पतसंस्थेला सदिच्छा भेट दिल्याने सर्व संचालक मंडळाचा उत्साह वाढला आहे. सर्व संचालक मंडळाला अशोक पितळे यांचे मार्गदर्शन लाभत असते. येणाऱ्या काळात पतसंस्था दोनशे ते तीनशे कोटीचा टप्पा पार करेल.

संतोष गांधी प्रास्ताविकात म्हणाले, संस्थेचे सभासद अशोक पितळे यांचे जैन ओसवाल पतसंस्थेला नेहमीच अनमोल असे मार्गदर्शन लाभत असते. तसेच उद्योजक सौरभ बोरा यांनी केलेले प्रगती पाहून संस्थेचे सभासद असल्याचा सर्वांना अभिमान वाटतो. बोरा यांनी संस्थेला भेट दिल्याने सर्व संचालक मंडळाला त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

यावेळी चेअरमन अभय पितळे यांनी स्वागत केले. व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी आभार मानले.

# मस्त दही रवा सँडविच

झटपट रेसिपी

मित्रांनो, नाश्त्याचा प्रश्न आपल्यापुढे आ वासून उभा असतो. तेच ते पदार्थ खाऊन कंटाळा आलेला असतो. अशा वेळी तुम्ही दही रवा सँडविच बनवू शकता.

सामग्री: ६ ब्रेड स्लाईस, एक कप रवा, एक कप दही, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा आल्याची पेस्ट, चिरलेली कोथिंबिर, तेल आणि चवीनुसार मीठ

कृती: हिरव्या मिरच्या बारीक चिरून घ्या. एका भांड्यात दही घेऊन त्यात रवा घाला. हे मिश्रण एकजीव करून दहा मिनिटं झाकून ठेवा. यानंतर त्यात हिरव्या मिरच्या, कोथिंबिर, आल्याची पेस्ट आणि मीठ घाला. प्रत्येक ब्रेड स्लाईसचे दोन त्रिकोणी काप करा. प्रत्येक त्रिकोणी तुकड्याच्या दोन्ही बाजूंना दही आणि रव्याचं मिश्रण लावून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. आता दही रव्याचं मिश्रण लावलेले ब्रेड सोनेरी रंगावर दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.






# 'एमआरआय'ला 'मिडजर्नी स्कॅनर'चा पर्याय

व्हॉट्स न्यू?

एका मिनिटात संपूर्ण शरीराचा 'थ्रीडी' नकाशा.. बिनकिरणोत्सर्ग, अतिशय वेगवान आणि सोपा... अशा आश्चर्यकारक तंत्रज्ञानाची घोषणा केली आहे, 'मिडजर्नी' या प्रसिद्ध 'एआय कंपनी'ने. त्यांच्या नवीन मिडजर्नी स्कॅनरमुळे भविष्यात मोठ्या 'एमआरआय' मशीनची गरजच संपुष्टात येऊ शकते.

'मिडजर्नी'चे 'सीईओ' डेव्हिड होल्झ यांनी या उपकरणाला 'विचित्र, वेडेपणाचे पण विलक्षण' असे म्हटले आहे. हे स्कॅनर अल्ट्रासोनिक (ध्वनी लहरी) तंत्रज्ञानावर काम करते. स्कॅन करण्यासाठी व्यक्तीला फक्त एक मिनिट पाण्याच्या टाकीत उभे राहावे लागते. सेन्सर्स शरीराच्या वेगवेगळ्या कोनातून ध्वनी लहरी पाठवतात आणि त्यातून स्नायू, चरबी, हाडे, अवयव यांचा संपूर्ण थ्री डी नकाशा तयार होतो. 'एआय' या माहितीचे विश्लेषण करून स्पष्ट आणि उपयुक्त प्रतिमा तयार करते. सध्या 'एमआरआय स्कॅन'साठी ३० ते ९० मिनिटे लागतात, बंद जागेत अडकल्यासारखे वाटते आणि काहींना आवाजाने भीती वाटते, तर 'मिडजर्नी स्कॅनर' फक्त एक मिनिटात हे सगळे काम पूर्ण करतो. सर्वात मोठा फायदा म्हणजे यात कोणतेही किरणोत्सर्ग किंवा चुंबकीय क्षेत्र तयार होत नाही. म्हणून गर्भवती स्त्रिया, लहान मुले आणि ज्यांना वारंवार स्कॅनची गरज असते त्यांच्यासाठी हे खूप सुरक्षित ठरेल.

कंपनीचा दावा आहे, की अनेक आजारांच्या निदानात हे 'एमआरआय'च्या तोडीचे किंवा त्याहून चांगले परिणाम देऊ शकते. सुरुवातीला हे स्कॅनर शरीरातील चरबी, स्नायू आणि एकूण आरोग्याचे नकाशे (बॉडी कंपोझिशन मॅप्स) तयार करण्यासाठी वापरले जाईल. नंतर पूर्ण वैद्यकीय निदानासाठीही विकसित केले जाईल. सध्या हे उपकरण प्राथमिक टप्प्यात आहे आणि वैद्यकीय मंजुरी (एफडीए) प्रक्रियेत आहे; पण कंपनी वेगाने पुढे जात आहे. पुढील वर्षी सॅन फ्रान्सिस्कोमध्ये पहिले 'मिडजर्नी स्पा' उघडले जाईल, त्यात १० स्कॅनर्स असतील. २०२८ पर्यंत अशी अनेक स्पा सुरू करण्याचे आणि पुढील सहा वर्षांत ५०,००० स्कॅनर्स बाजारात आणण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

# रेतीत फुलवली आंब्याची बाग

अचिव्हर



एकेकाळी शेतीसाठी पूर्णपणे निरुपयोगी आणि ओसाड मानली गेलेली रेतीची जमीन आज एका शेतकऱ्याच्या दूरदृष्टीमुळे लाखोंची कमाई करून देत आहे. मध्य प्रदेशातील नरसिंहपूर जिल्ह्यातील गाडरवारा तालुक्यातील छेना कछार गावात छिंदवाडा येथील शेतकरी विजयपाल सिंह पटेल यांनी पारंपरिक शेतीचा मार्ग सोडून नदीकाठच्या सुमारे ७० एकर रेतीच्या जमिनीवर आधुनिक आंब्याची बाग फुलवली आहे.


ही बाग विकसित करण्यासाठी विजय पाल यांनी इस्रायलमधील प्रसिद्ध 'अल्ट्रा हाय डेन्सिटी' तंत्रज्ञानाचा अवलंब केला. कमी जागेत अधिक झाडे लावून जास्त उत्पादन घेण्यासाठी हे तंत्रज्ञान ओळखले जाते. पारंपरिक पद्धतीत एका एकरात साधारण ६५ ते १०० आंब्याची झाडे लावली जातात; मात्र 'अल्ट्रा हाय डेन्सिटी' तंत्रज्ञानामुळे एका एकरात ४०० ते १,४०० झाडांची लागवड शक्य होते. याच तंत्रज्ञानाच्या मदतीने विजय पाल यांनी ७० एकर क्षेत्रात तब्बल ५४ हजार आंब्याची झाडे लावली आहेत. यामध्ये मुख्यतः केसर आणि लंगडा या उच्च दर्जाच्या जातींचा समावेश आहे.

झाडांची लागवड करण्याबरोबरच त्यांनी फळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी बॅगिंग तंत्रज्ञानाचाही वापर केला आहे. या पद्धतीत झाडावरील प्रत्येक आंबा विशेष संरक्षक पिशवीने झाकला जातो. त्यामुळे फळांचे कीड आणि रोगांपासून संरक्षण होते. परिणामी आंब्याचा नैसर्गिक रंग, चमक आणि गुणवत्ता अधिक चांगली राहते आणि बाजारात त्याला अधिक भाव मिळतो. उच्च गुणवत्तेमुळे त्यांच्या केसर आंब्याला प्रतिकिलो १७२ रुपयांपर्यंत दर मिळाला, तर लंगडा आंबाही ८० ते १२० रुपये प्रतिकिलो दराने विकला गेला. त्यांच्या बागेतील आंबे आता इंदूर, जयपूर आणि गुजरातमधील मोठ्या बाजारपेठांमध्ये पोहोचत आहेत.

विजय पाल सांगतात, की अशा आधुनिक फळबाग प्रकल्पात सुरुवातीची तीन वर्षे उत्पादन मिळत नाही. प्रारंभीचा खर्चही मोठा असतो. त्यामुळे अनेक शेतकरी हा धोका पत्करण्यास तयार होत नाहीत; मात्र बाग एकदा उत्पादनक्षम झाली, की उत्पन्नाचे नवे मार्ग खुले होतात. गेल्या वर्षी त्यांना प्रतिएकर सुमारे पाच टन आंब्याचे उत्पादन मिळाले होते. यंदा अवकाळी गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे उत्पादनावर परिणाम झाला असला, तरीही चांगल्या उत्पन्नाची त्यांना अपेक्षा आहे. विजय पाल यांच्या मते, आजच्या काळात शेतीला तोट्याचा व्यवसाय म्हणणे योग्य नाही. पारंपरिक पद्धतीऐवजी आधुनिक विचार, वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन नियोजनाचा अवलंब केल्यास शेती नफ्याचा व्यवसाय ठरू शकते. रेतीच्या जमिनीवर उभी राहिलेली ही आंब्याची बाग योग्य तंत्रज्ञान, मेहनत आणि नियोजनाच्या बळावर अशक्य वाटणारे उद्दिष्टही साध्य करता येते, याचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

## टेक्नो टॉक

### आता थेट 'आयफोन २०'



'ॲपल' कंपनी आपल्या आयफोन चाहत्यांसाठी एक मोठा सरप्राइज तयार करत आहे. या वर्षी 'आयफोन १८' सीरीज लॉंच झाल्यानंतर पुढील वर्षी 'आयफोन १९' लाइनअप बाजारात येणार नाही. थेट 'आयफोन २०' सीरीज आणली जाईल अशी खास माहिती समोर आली आहे.

२०२७ मध्ये आयफोनला २० वर्षे पूर्ण होत आहेत. या खास वर्षानिमित्त 'ॲपल'ने आयफोन १९ वगळून थेट २० नंबरची सीरीज लॉंच करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी २०१७ मध्ये आयफोनला दहा वर्षे पूर्ण झाली, तेव्हा कंपनीने आयफोन ९ ऐवजी आयफोन एक्स लॉन्च केला होता. आता तीच रणनीती पुन्हा वापरली जात आहे. आयफोन २० प्रो आणि प्रो मॅक्स मॉडेल्सना व्ही ७३ आणि व्ही ७४ अशी नावे देण्यात आली आहेत. या फोनमध्ये २ नॅनोमीटर प्रक्रियेवर बनवलेला पॉवरफुल ए २१ प्रो चिपसेट वापरला जाण्याची शक्यता आहे. सगळ्यात मोठी खासियत म्हणजे डिझाइन. संपूर्ण काचेचे युनिबॉडी डिझाइन, फेस आयडी आणि सेल्फी कॅमेरा डिस्प्लेच्या आत लपवले जाणार आहे. यामुळे कोणतेही कटआउट किंवा डायनॅमिक आयलँड दिसणार नाही. समोरचा भाग पूर्णपणे क्लीन आणि सुंदर दिसेल.

एक लीकनुसार, आयफोन २० साठी सॅमसंगकडून खास डिस्प्ले येऊ शकतो. तो सध्याच्या स्क्रीनपेक्षा जास्त ब्राइट, पातळ आणि वक्र असेल. यामुळे फोन हातात धरणे सोपे होईल आणि कडा जास्त नैसर्गिक दिसतील. या डिस्प्लेचा वापर नंतर सॅमसंग आपल्या 'गॅलेक्सी एस २८' मध्येही करू शकते.

सध्या ॲपल आयफोन १८ प्रो मॉडेल्स आणि आपला पहिला फोल्डेबल आयफोन तयार करत आहे. या वर्षी सप्टेंबरमध्ये लॉंच होणाऱ्या प्रो मॉडेल्समध्ये नवीन चिपसेट, व्हेरिएबल ॲपर्चर कॅमेरा, मोठी बॅटरी आणि नवीन रंगाचे पर्याय असतील. एकूणच आयफोन २० खरोखरच 'ॲपल'चा ड्रीम फोन ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आयफोन प्रेमींसाठी पुढचे दोन वर्ष खूप रोमांचक ठरणार आहेत.

## एआय वर्ल्ड

### 'सिन्थेसिया एआय' शिका

स्क्रीनवर एक व्यक्ती आत्मविश्वासाने बोलत आहे. चेहऱ्यावरील हावभाव नैसर्गिक आहेत. आवाज स्पष्ट आहे. पाहणाऱ्याला वाटते, की हा व्हिडीओ एखाद्या स्टुडिओमध्ये शूट केला असावा; मात्र आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती व्यक्ती खरी नसते! हा व्हिडीओ तयार केलेला असतो कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आणि हे शक्य करून दाखवणाऱ्या प्लॅटफॉर्मचे नाव आहे 'सिन्थेसिया-एआय' पूर्वी व्हिडिओ तयार करायचा म्हणजे कॅमेरा, प्रकाशयोजना, शूटिंग, एडिटिंग आणि बराच खर्च अपरिहार्य होता. आज मात्र परिस्थिती बदलत आहे. 'सिन्थेसिया'मध्ये वापरकर्त्याला फक्त स्क्रिप्ट लिहायची असते. त्यानंतर एआय त्या मजकुराचे रूपांतर व्हिडीओमध्ये करते. स्क्रीनवर दिसणारा 'एआय' अवतार दिलेला मजकूर वाचतो आणि काही मिनिटांत व्यावसायिक दर्जाचा व्हिडीओ तयार होतो. या प्लॅटफॉर्ममध्ये विविध प्रकारचे डिजिटल प्रेझेंटर्स उपलब्ध आहेत. ते वेगवेगळ्या वयोगटांचे, देशांचे आणि व्यक्तिमत्त्वांचे प्रतिनिधित्व करतात. याशिवाय नैसर्गिक आवाज, वविध भाषा, सादरीकरणासाठी तयार टेम्पलेट्स, ग्राफिक्स आणि टेक्स्टचे पर्याय, यामुळे व्हिडिओ तयार करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी होते. ऑनलाइन शिक्षण वाढत असताना शिक्षकांसमोर आव्हान असते, दर्जेदार व्हिडिओ कंटेंट तयार करण्याचे. 'सिन्थेसिया'मुळे शिक्षकांना पटकन लेक्चर तयार करता येतात, अभ्यासक्रम विविध भाषांमध्ये सादर करता येतो, पुन्हा शूटिंगची गरज कमी होते आणि विद्यार्थ्यांसाठी आकर्षक सादरीकरण करता येते. जगभरातील अनेक संस्था कर्मचारी प्रशिक्षणासाठी 'एआय व्हिडीओं'चा वापर करू लागल्या आहेत. कारण : कमी खर्च, कमी वेळ, वेगवेगळ्या भाषांतील आवृत्त्या आणि पटकन बदल आणि अद्ययावत माहिती. पूर्वी एखादा प्रशिक्षण व्हिडीओ अपडेट करण्यासाठी पुन्हा शूटिंग करावे लागत असे. आता फक्त स्क्रिप्ट बदलली की नवीन व्हिडीओ तयार होतो. अनेकांना ज्ञान असते, कल्पना असतात; परंतु कॅमेऱ्यासमोर बोलण्याचा आत्मविश्वास नसतो. काहींना शूटिंगसाठी वेळ मिळत नाही, तर काहींना एडिटिंगचे कौशल्य नसते. अशा वेळी 'सिन्थेसिया' एक पर्याय उपलब्ध करून देते. वापरकर्ता फक्त आपला संदेश लिहितो आणि 'एआय' तो प्रभावी व्हिडीओच्या स्वरूपात सादर करते. 'सिन्थेसिया'ची प्रभावी क्षमता म्हणजे बहुभाषिक सादरीकरण. एकाच कंटेंटचे रूपांतर मराठी, हिंदी, इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच अशा अनेक भाषांमध्ये करता येते. त्यामुळे स्थानिक माहिती जागतिक प्रेक्षकांपर्यंत आणि जागतिक माहिती स्थानिक भाषेत पोहोचवणे अधिक सोपे होत आहे. 'एआय' व्हिडीओ जितके प्रभावी आहेत तितक्याच काही चिंतादेखील व्यक्त केल्या जात आहेत. कारण तंत्रज्ञानाचा गैरवापर करून खोटे व्हिडीओ तयार केले जाऊ शकतात, व्यक्तींची नक्कल केली जाऊ शकते, दिशाभूल करणारी माहिती पसरवली जाऊ शकते. म्हणूनच एआयचा वापर करताना पारदर्शकता, नैतिकता आणि जबाबदारी या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरणार आहेत.

# रात्री अभ्यास करताय?


स्टडी टिप्स

सकाळी लवकर उठून अभ्यास करणे सगळ्यांनाच शक्य होत नाही. काही विद्यार्थ्यांना सकाळी जाग येत नाही तर काहीजणांना शाळा, कॉलेज, ट्युशन किंवा इतर जबाबदाऱ्या सांभाळताना सकाळची वेळ पाळता येत नाही. अशा वेळी रात्रीचा अभ्यास हा एक चांगला पर्याय ठरतो. रात्री वातावरण शांत असते तसेच फोनचे आणि बाहेरचे व्यत्यय कमी असतात. त्यामुळे मेंदू अधिक एकाग्र राहतो आणि अभ्यासाची गुणवत्ता सुधारते. मात्र रात्री अभ्यास करताना काही महत्त्वाच्या टिप्स लक्षात घेतल्या, तर त्या अधिक फायदेशीर ठरतात.

* चांगली झोप

दिवसभराची झोप पूर्ण झाल्याशिवाय रात्री अभ्यास करणे कठीण ठरते. काही कारणाने झोप कमी झाली तर थकवा आणि डोळ्यांवर ताण येतो आणि एकाग्रता साधता येत नाही. त्यामुळे रात्री अभ्यास करायचा असेल तर दिवसा ६-७ तासांची शांत झोप घेणे अत्यावश्यक आहे. झोप पूर्ण झाल्यास मेंदू अधिक ताजातवाना राहतो आणि अभ्यास करत राहण्याची क्षमता वाढते.

* कॉफी



रात्री अभ्यास करताना झोप येते. अशावेळी कॉफी किंवा ग्रीन टीसारखे पेय मेंदूला सतर्क ठेवतात. विशेषतः कॅफेनमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहतो आणि झोप दूर राहते. मात्र कॉफीचा अतिरेक टाळा. दिवसभरात १-२ कप कॉफी पुरेशी आहे. जास्त कॅफेनमुळे झोपेचे चक्र बिघडू शकते.

* प्रकाश


अनेक वेळा विद्यार्थी फक्त टेबल लॅम्प लावतात आणि इतर खोली अंधारात ठेवतात. यामुळे झोप येण्याची शक्यता वाढते. अंधार झोपेस प्रोत्साहन देतो. त्यामुळे संपूर्ण खोलीमध्ये सौम्य पण समप्रकाश असावा.

# पावसाळ्यात इथे भेट द्या

वर्षाविहार

मॉन्सूनची सुरुवात झाली, की अनेकांना निसर्गाच्या सान्निध्यात जायला खूप आवडते. कारण या दिवसात निसर्गाचं एक मनमोहक रूप पाहायला मिळते. रिमझिम पावसात गरम गरम चहा आणि भज्यांचा आस्वाद घेणे, आसपास हिरवळ, थंड वातावरण मनाला एक भुरळ पाडते. त्यामुळे या दिवसात अनेकजण पार्टनर सोबत लॉंग ड्राइव्हला फिरायला जाण्याचा प्लॅन करतात, तर पावसाळ्यात एखाद्या ठिकाणाला भेट देण्याऐवजी तेथील रस्ते आणि रस्त्यांच्या आजूबाजूंनी निसर्गाने ओढलेली हिरवी शाल हे दृश्य पाहणे खरच अविस्मरणीय ठरते.

मुंबई ते लोणावळा- पावसाळ्यात मुंबई ते लोणावळा तुमच्या गाडीने प्रवास करण्याचा प्लॅन करायला हवा.



विशेषतः पश्चिम घाट हिरव्यागार वनराईने नटलेला असतो आणि तिथली दृश्ये स्वर्गासारखे सुंदर असते. हलके धुके, तरंगणारे ढग आणि विविध ठिकाणी दिसणारे छोटे धबधबे या मार्गाचे सौंदर्य आणखी वाढवतात.

दिल्ली ते लॅन्सडाउन - गाडीने लॅन्सडाउनला जाऊ शकता. लॅन्सडाउनला जाणारा रस्ता अत्यंत सुंदर आहे. जसा रस्ता गढवालमधील टेकड्यांसारख्या डोंगरांवर चढतो, तसे पाइनच्या जंगलांचे दृश्य, पर्वतांवरील धुके आणि नैसर्गिक सौंदर्यात पसरलेली शांतता मनाला सुखद वाटते.


चेन्नई ते पुदुचेरी - दक्षिणेकडे तुम्ही चेन्नई ते पुदुचेरी असा रोड ट्रिप करू शकता. पूर्व किनारपट्टीचा रस्ता वर्षभर मनमोहक असला, तरी पावसाळ्यात त्याचे रूपांतर एका स्वप्नवत दृश्यात होते. पावसाने भिजलेले रस्ते, थंडगार वारे, बंगालचा उपसागर आणि धुरकट आकाश हे सर्व मिळून एक असे दृश्य तयार करतात, जे शब्दातीत आहे.





# आता माध्यम, विषय, शाखा, महाविद्यालय बदला

शिक्षणसंधी

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अकरावी, बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यम, विषय, शाखा (शास्त्र, वाणिज्य, कला) किंवा थेट कनिष्ठ महाविद्यालय बदलण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सर्व प्रक्रियेसाठी शिक्षण विभागाकडून विशेष ऑनलाइन संगणकीय प्रणाली विकसित केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अकरावीमधून बारावीमध्ये किंवा अकरावीमधून पुन्हा अकरावीमध्ये प्रवेश घेताना आपले माध्यम, विषय आणि विद्याशाखा बदलण्याची ऑनलाइन सुविधा असेल. राज्य मंडळाव्यतिरिक्त सीबीएसई, आयसीएसई किंवा परराज्यातून आलेल्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अकरावीत आणि अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बारावीत राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेता येणार आहे.







# निसर्गाच्या सानिध्यात जा

भटकंती

तुम्हाला रोजच्या धावपळीतून कुठे तरी शांत व कमी गर्दीच्या ठिकाणी जायचे असेल तर तामिळनाडू राज्यात लपलेले रत्न कोटागिरी स्टेशन तुमच्यासाठी एक योग्य ठिकाण असू शकते. जुलैमध्ये येथील हवामान खूप आल्हाददायक असते. तुम्हाला पावसाळ्यात डोंगराळ भागामध्ये फिरायला जायचे असेल आणि तेथील निसर्गाचा आनंद घ्यायचा असेल, तर कोटागिरी हा एक उत्तम पर्याय आहे.

निलगिरी पर्वतरांगांच्या तिसऱ्या सर्वोच्च शिखरावर असलेले कोटागिरी हे समुद्रसपाटीपासून सुमारे एक हजार आठशे मीटर उंचीवर वसलेले आहे. येथून तुम्हाला दऱ्याखोऱ्यांचे विहंगम दृश्य पाहायला मिळेल. या हिल स्टेशनचे वैशिष्ट्य म्हणजे ते उटी आणि कुन्नूर सारख्या प्रसिद्ध हिल स्टेशनपासून थोडे दूर आहे. त्यामुळे येथे तुलनेने कमी गर्दी असते आणि तुम्हाला अतिशय शांत, प्रदूषणमुक्त वातावरणात निसर्गाचे खरे सौंदर्य पाहायला मिळते. जुलैमध्ये पावसाच्या हलक्या सरी डोंगरांवर पडतात तेव्हा कोटागिरीच्या दऱ्या अधिक हिरव्या आणि फ्रेश दिसतात. या ऋतूत येथील चहाचे मळे, उंच देवदाराची झाडे, धुक्यानी वेढलेले पर्वत आणि विस्तीर्ण जंगले हे अधिकच जादुई दिसतात. पावसाळ्यात येथील धबधबे पूर्ण क्षमतेने वाहतात आणि हे सौंदर्य पाहून मन मंत्रमुग्ध होते.

या हिल स्टेशनवरील कॅथरीन फॉल्स हा धबधबा अडीचशे फूट उंचीवरून पडतो आणि आजूबाजूचे दृश्य इतके अद्भुत आहे की तुम्ही लगेच तुमच्या कॅमेऱ्यात कैद केल्याशिवाय राहणार नाही. हा धबधबा एक शांत वातावरणात वसलेला आहे आणि ट्रेकिंग प्रेमींसाठी एक उत्तम ठिकाण आहे. कोटागिरीमध्ये अनेक सुंदर ट्रेल्स आहेत जिथे तुम्ही ट्रेकिंग किंवा लांब चालण्याचा आनंद घेऊ शकता. विशेषतः कोटागिरी ते रंगास्वामी शिखरापर्यंतचा ट्रेक ॲडव्हेंचरने भरलेला आहे. येथून तुम्ही सूर्यास्त आणि सूर्योदय पाहू शकता.

निलगिरी टेकड्यांवर असलेल्या चहाच्या बागांना भेट दिल्याने एक वेगळीच शांतता मिळते. तुम्ही येथील ताज्या चहाचा आस्वाद घेऊ शकता आणि चहा उत्पादनाची प्रक्रिया जवळून पाहू शकता.

**येथे पोहोचायचे कसे?**

येथे ट्रेनने जायचे असेल तर सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन मेट्टुपलयम आहे. ते कोटागिरीपासून सुमारे ३३ किलोमीटर अंतरावर आहे. येथून कोटागिरीला टॅक्सी किंवा लोकल बसने जाता येते. सर्वात जवळचे विमानतळ कोइम्बतूर आहे.

# फॅशनच्या युगात भरतकामाचे रंग

फॅशन पॅशन



फॅशन च्या युगात डिझाइन आणि पॅटर्नमध्ये दररोज नवे प्रयोग केले जात आहेत. विशेषतः भरतकामात आजकाल बरेच काम केले जात आहे. भरतकामाचा समावेश सदाबहार डिझाइनमध्ये केला जात असला तरी, फॅशन आणि तंत्रज्ञानाच्या ट्रेंडमध्येही डिझायनर्स काम करत आहेत. याअंतर्गत आता शहरात उपलब्ध असलेल्या कपड्यांमध्येही देश आणि वेगवेगळ्या राज्याचे भरतकाम दिसून येते. भरतकामाच्या कलेला शक्य तितके प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी ३० जुलै रोजी जागतिक भरतकाम दिन साजरा केला जातो. भरतकाम वर आधारित डिझाइन्स फॅशन ट्रेंड वाढवत आहेत. विद्यार्थी नावीन्यपूर्ण गोष्टी करत आहेत. शहरात कार्यरत असलेल्या महाविद्यालयांच्या फॅशन टेक्नॉलॉजी आणि टेक्सटाइल विभागांमध्ये मुले नावीन्यपूर्ण आणि प्रायोगिक डिझाइन्स आणि ड्रेसेसवर काम करत आहेत. ट्रेंडसोबतच आता रेशमी आणि सुती धाग्यांसह स्टोन, कुंदन, मोती आणि तारेदेखील वापरले जात आहेत. यासोबतच बाटिक, वाघ आणि आदिवासी प्रिंट फॅब्रिक्समध्येही भरतकाम केले जात आहे.

शहरातील मुलींमध्ये, कुर्ती आणि सूटमध्ये भरतकामाचा पॅटर्न सर्वाधिक पसंत केला जात आहे. शॉर्ट कुर्तीमध्येही पुन्हा एकदा भरतकामाचा पॅटर्न लोकप्रिय होत आहे. 'एव्हरग्रीन पॅटर्न'मध्ये भरतकामाचा समावेश आहे. परंतु थंड आणि आरामदायी लूकसाठी, आजकाल शॉर्ट कुर्तींमध्ये ते खूप पसंत केले जात आहे. शहरात वेगवेगळ्या शैलींमध्ये भरतकाम केलेले कपडे उपलब्ध आहेत. यामध्ये कर्नाटकच्या कुसुट्टी आणि काश्मिरी डिझाइनची एक विशेष श्रेणी समाविष्ट आहे. फॅशन डिझायनर्सच्या मते भरतकाम फार महाग नाही. त्यामुळे त्यात बरेच नावीन्यपूर्ण काम करता येते.

